# कोरी कविता

--चं.प्र.देशपांडे

## कवितेतील अ - भाव

-- १ --

आपल्या मनाच्या कृतींचे, ढोबळ मानाने, 'वैचारिक कृती ' आणि ' भावनिक किंवा भावयुक्त कृती ' असे विभाजन गृहीत धरले जाते. त्या अनुषंगाने कविता माध्यमाच्या संदर्भात काही विचार इथे करायचा आहे. जगात इतरत्र या गोष्टी अत्यंत सूक्ष्मपणाने विचारात घेतल्या गेलेल्या असल्या तरी आजच्या आपल्या आधुनिक कवितेच्या संदर्भात काही विचार मांडणे आवश्यक वाटते. इथे कोणतीही प्रणाली मांडण्याचा अभिनिवेश नसून आपल्या कवितेच्या क्षेत्रात निश्चितपणे अस्तित्वात असलेल्या परंतु उपेक्षित राहिलेल्या एका महत्त्वाच्या प्रश्नाचा सांगोपांग निर्देश करणे, एवढाच या विवेचनाचा उद्देश आहे.

विचार आणि भावना या दोन्ही अंगांनी मनाच्या कृती चालत असल्या तरी मराठी कवितेचा प्रवास तुलनेने फारच प्रचंड प्रमाणावर भावनेच्या अंगानेच झालेला आहे. अर्थात विशुध्द फरक गृहीत धरण्याचा या विधानात उद्देश नाही. परंतु भर कोणत्या बाजूवर आहे हेच इथे सुचवायचे आहे. अजूनही अगदी मान्यवर टीकाकारांचे दंडकसुध्दा ' रोमँटिक' किंवा अधिक व्यापक शब्दात ' भावनिक ' कवितेला जास्त अनुकूल आहेत. आपल्या एकूण परंपरेचा हा परिणाम आहे हे जरी मान्य केले, तरी हा परिणाम एक मोठा प्रश्नही बनू पाहतो आहे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आजच्या अनेक कवींना आपापल्या कुवतीप्रमाणे, आपापल्या भावनांचे उद्‌गार किंवा प्रतिक्रियारूप आविष्कार देत राहण्यापेक्षा या प्रक्रियेतील एकूणच रचनेचा आवाका अजमावण्याचीही आवश्यकता वाटू लागलेली आहे. परंतु हा बदलता दृष्टिकोण पचवणे हे सराईत वाचक आणि सराईत टीकाकार या दोघांनाही कठीण जात आहे.

-- २ --

' सत्यकथे' च्या फेब्रुवारी १९७८ च्या अंकात प्रसिध्द झालेली रामचंद्र वामन कदम यांची ' सभासद' ही कविता (बहुतेक या कवीची ही पहिलीच प्रकाशित कविता असावी. चूकभूल माफ असावी.) म्हणजे वर उल्लेख केलेल्या बदलत्या दृष्टिकोणाचा अस्सल शक्तिमान आविष्कार आहे.( ' दृष्टिकोण ' -- सारखे स्थितिशील शब्द अशा विश्लेषक लेखनात सोयीसाठी वापरणे भाग आहे.)

विवेचनाच्या सोयीसाठी ' सभासद' ही कविता येथे देत आहे :

भविष्याची दैवी अनपेक्षितता अंगातून चमकून गेली
साक्षात्काराप्रमाणे ; संगीताप्रमाणे. संगीताप्रमाणे --
अस्तित्वाचं प्रवाही लावण्य मला जाणवलं आणि
त्याची स्वयंसिद्धता ; निराकार वस्तूंना लाभत राहणाऱ्या अनपेक्षित घनतेसारखी.

मी पाहिला भविष्याच्या अनपेक्षिततेचा निरोगी हात
घटनांची सघन शिवण करतांना, आणि त्याची
सर्जक किमया -- वर्तमानाच्या ओसाड फांद्यांतून
अनपेक्षित पर्णमयता नांदवितांना.

आता अनुक्रम जाणवणार नाही, सूर्योदयांसारखा.
सूर्यप्रकाशाचा सतत नवीन पदार्थ आता
आणि वस्तूंची ताजी कठिणता.

आता मी सभासद झालो
अनपेक्षिततेच्या सृजनशील व्यवस्थेचा.

ही आजची अत्यंत महत्त्वाची कविता असंख्य सराईतांना उत्स्फूर्तपणे जाणवू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. कारण "ही कविता 'रुक्ष' आहे, तिच्यात भावनेचा ओलावा नाही, भारून टाकणे नाही. या कवितेच्या ओळी 'मूड' निर्माण करत नाहीत. ही कविता आमच्या मनात रेंगाळत राहत नाही. दीर्घकाळ स्मरणात राहावे, पुन्हापुन्हा आठवावे, घोळवत राहावे असे 'द्रव्य' या कवितेत नाही" एवढेच म्हणून आपण थांबत नाही, तर, "या सर्व गोष्टी नसलेल्या या ओळींना 'कविता' म्हणायचे तरी कारण काय?" हेही म्हणण्यापर्यंत आपली मजल जाते -- ही परिस्थिती निकोप नाही. कविता माध्यमाच्या, काही विशिष्ट कारणांनी, एका विशिष्ट मर्यादेत होत राहिलेल्या वापराच्या सवयीचा हा परिणाम आहे. आपल्याला सवय असलेल्या या माध्यमाच्या सीमारेषा या 'निश्चित' आणि 'अंतिम' असल्याचा हेकट आग्रह यात अंतर्भूत आहे. प्रत्येक काळात बदलत्या आविष्कार-पध्दतींना असाच प्रतिकार होत आलेला असला तरी आताच्या आपल्या तथाकथित 'खुल्या ' वातावरणातही तेच घडत आहे हेही पाहिले पाहिजेच.

'सभासद' ही कविता आहे की गद्य लेखन आहे? शब्दांची ओळींतून केलेली मांडणी इथे आवश्यक आहे की नाही ? ( आणि ओळींची विशिष्ट रचना आवश्यक नसलेले सर्वच लेखन गद्य -- म्हणजे अ - कविताच असते काय ? ) ही कविता जर भावनिक अनुभव देत नसेल तर काय देते ? हे नुसते विचार आहेत का ? इथे भावनेचा संपूर्ण अभाव आहे का ?

-- या संदर्भात काही गोष्टी बारकाईने पाहणे आवश्यक आहे.

दगड, रस्ता, थिएटर, टॅक्सी, चांदणी, फूल, रात्र -- या सर्व जशा वस्तू आहेत तशीच भावना हीही एक वस्तूच आहे. संबंधांचे -- अनुभवांचे भान अभिव्यक्त होताना निरनिराळ्या वस्तूंचा कवितेत 'कच्चा माल' म्हणून शब्दरूप वापर होतो. कविता ही एक वस्तूच असते. या गोष्टी कळत-नकळत आपल्याला मान्य असतात. परंतु 'विचारा' च्या बाबतीत मात्र दुजाभाव दिसून येतो. विचारही वस्तुतः वस्तू असतातच. मग दृश्य--नाद--भाव यांच्या रचनेतून जर भान अभिव्यक्त होऊ शकते, तर विचारांच्या रचनेतून का होऊ शकणार नाही ?

कवितेत ज्याप्रमाणे 'रस्ता' हा शब्द 'रस्ता' ही माहिती देण्यापुरताच मर्यादित असत नाही, तशीच विचारकृतीही विचारकृतीपुरतीच मर्यादित असत नाही-- हे मान्य होण्यात काय अडचण येते ? 'विचार' हा शब्द आपण बहुतेक स्थितिशील, मर्यादित अर्थानेच वापरतो हेच याचे कारण असावे. म्हणूनच विचार-कृतींचे क्षेत्र म्हणजे फक्त निबंध, प्रबंध किंवा भाषण असेच आपल्याला वाटते.( अर्थात हे प्रकार प्रचंड भावनात्मक झालेलेही आपल्याला चालतात !) विचारकृती ही केवळ व्यक्तिनिरपेक्ष अशी शास्त्रीय परिभाषाच असते का ? विचारकृती ही फक्त तर्कशास्त्राशीच निबध्द असते का ? विचारकृती ही कलेची -- कवितेची भाषा असू शकते की नाही ? हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. यात बराच गोंधळ आहे.

विचारकृतीचा प्रत्येक आविष्कार आपण चटकन प्रचारक्षेत्रात ढकलतो. विचारकृती ही फक्त माहिती देणारी किंवा पटवून देणारी कृती असते असे आपण समजतो. वस्तुतः राजकीय वातावरण पाहिले तर भावनिक प्रचार हा वैचारिक प्रचाराइतकाच -- किंबहुना जास्तच प्रमाणात--प्रभावी ठरतो असे दिसून येते. म्हणजे भावना हा आमचा अधू भाग ( वीक पॉइंट ) असून त्याचे शोषण होण्याचाच हा फक्त प्रकार असतो काय ? भावना ही विचारापेक्षा अधिक सहजप्रेरणा --उत्स्फूर्त प्रेरणा असते काय ? आणि म्हणून ' कलेचे क्षेत्र हे मुख्यतः भावनेचे क्षेत्रच राहणार ' असे काही आहे काय ? की भावना ही सनसनाटी असल्याने जिवंत वाटते आणि विचार हा सनसनाटी असू शकत नसल्याने मृत वाटतो ? विचार जेव्हा सनसनाटी वाटतो तेव्हा विचार वेगळा आणि त्याचा सनसनाटीपणा ही भावना वेगळी असे असते काय ? भावकृती ही अधिक व्यापक किंवा अमर्याद आणि विचारकृती म्हणजे स्थितिशील -- मर्यादित असे काही असते काय ?

-- तर असे काहीही नसते. भावकृती आणि विचारकृती या दोहोंचेही वस्तुरूप एकदा मान्य केल्यावर असा कोणताही मूलभूत फरक या कृतींत मानता येणार नाही. दोन्हीही कृती वस्तुतः स्थितिशील आणि मर्यादितच असल्या, तरी संबंधांचे भान हे दोन्हीही कृतींना अर्थाची अमर्यादता देऊ शकते हेच स्वच्छपणे पाहणे आवश्यक आहे. कवितेतील 'रस्ता'

जसा रस्ता म्हणून माहीत होऊन संपत नाही, तसाच ' विचार ' ही विचार म्हणून माहीत होऊन संपत नाही. रस्ता, रात्र आणि कोणतीही भावना ही जशी कवितेत प्रतीकात्मक असू शकते, तसाच विचारही प्रतीकात्मक असू शकतो.

हा सगळा घोळ निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे ' कविता ही वैयक्तिक प्रतिक्रियांचे संक्रमण करण्यासाठीच असते ' -- ही आखीव समजूत होय. यातच वैयक्तिक गुंतवणुकीचा प्रश्नही गुंतलेला असतो. भावकृती ही जशी सहजपणाने 'व्यक्तिविशिष्ट कृती ' म्हणून आपण स्वीकारतो, तशी विचारकृती स्वीकारत नाही. एक सवय म्हणून अस्तित्वात असलेल्या या एकूणच दृष्टिकोणातला खोटेपणा आणि त्यातली तथ्यहीनता लक्षात येऊ लागलेल्या आजच्या अनेक कवींना परंपरेच्या फारशा पाठिंब्याशिवाय या सवयीच्या दगडी आस्वादपध्दतीपुढे उभे राहावे लागत आहे. याबद्दल अर्थात त्या कवींनी फारशी खंत करत राहण्याचे कारण नसले, तरी हा एक महत्त्वाचा प्रश्न सर्वांनीच पाहण्याची आवश्यकता आहे.

कवितेतील ' भावना ' आणि ' विचार ' हा फरक तसा ढोबळच असतो. परस्परांना पूर्णपणे वगळून या कृती कधीच नसतात. फक्त भर देण्याच्या किंवा एकूण प्रक्रियेच्या स्वरूपाच्या दृष्टीने हा फरक पाहता येतो. कवितेचे आणखी दोन महत्त्वाचे प्रकार म्हणजे (१) भावना किंवा विचार हे प्रतिक्रियारूप संक्रमणाच्या स्तरावर देणारी कविता आणि (२) भावना किंवा विचार यांच्या माध्यमातून अनुभवाच्या संबंध-रचनांचे संपूर्ण भान देणारी कविता. या दुसऱ्या प्रकारात भावना किंवा विचार यांना निव्वळ भावना किंवा विचार म्हणून महत्त्वाचे स्थान नसते. अशा कविता या सर्वात महत्त्वाच्या कलाकृती असतात. परंतु मूल्यविचार हा या लेखाचा मुख्य उद्देश नसून, आविष्कार प्रक्रियेतील स्वरूपविषयक प्रश्न पाहणे हा मर्यादित उद्देश आहे. त्यामुळे हा मुद्दा या ओझरतेपणातच सोडून देऊ.

-- ३ --

व्यक्तिगत श्रध्देची प्रखरता घेऊन येणाऱ्या विचारकृतींना कविता म्हणून स्वीकारणे शक्य होत असल्याचे दिसून येते. भावनिक तीव्रता, उत्कटता किंवा श्रध्देची प्रखरता हे कवितेचे मूल्य ठरू शकते काय ? 'मूल्य ' हा शब्द सोडून दिला तरी ते अपरिहार्य ' लक्षण ' तरी ठरू शकते काय ? ' बांधिलकी ' या अलिकडे विशेष प्रचारात आलेल्या शब्दाचाही इथे विचार होणे योग्य ठरेल. या संदर्भात सप्टेंबर १९७१ च्या ' स्पॅन ' मध्ये ' अमेरिकन पोएट्री इन द सिक्स्टीज ' या लेखात निसिम इझिकेल यांनी चर्चिलेली काही वैशिष्ट्ये पाहणे प्रस्तुत ठरेल. पीटर शेल्डालच्या ' रिलीज ' या कवितेतील त्यांनी उद्धृत केलेल्या ओळींचे मी केलेले मराठी रूपांतर येथे देत आहे :

माझे आयुष्य राहत आलेले आहे कंटाळवाणे
गोंधळलेले आणि कधीकधी अत्यंत घृणास्पद
आणि उद्रेकमय
परंतु मी कधीच काहीच उच्चारलेले नाही मुद्दाम,
अतिशय प्रामाणिकपणाशिवाय.

माझे स्वतःशीच असणारे मतभेद म्हणजे
असतात गैरसमज
एका बधिर आशावादाने पेललेले

बहुधा मी बाळगत नाही माझी मते
काही तासांहून अधिक काळ.

पुढे एका ठिकाणी इझिकेल लिहितात : ''शब्दकळेतील करडी संयतता, शक्तिभारित आणि घट्ट विणेचा घाटदारपणा आणि सखोल प्रतिमासृष्टी -- या आधुनिक अमेरिकन कवितेच्या बहुप्रिय तंत्रांचा इथे पूर्णपणे अभाव आहे. व्हिक्टोरियन आणि जॉर्जियन कवितेतील विस्तृतता आणि शब्दबंबाळपणा यांच्याविरुध्दचे बंड संपुष्टात आलेले असून त्या बंडाच्या उच्चरवाची आता गरज उरलेली नाही. आता आहे तो एक वेगळ्या प्रकारचा लिरिसिझम, एक सहज, नियत प्रवाहीपणा -- ना अतिवास्तववादी उद्रेक, ना तंद्री--समाधीसारखी सौदर्यकुशलता -- तर एक काव्यात्म विचारीपणा."

तपशीलांच्या फरकाने मराठीत होत असलेले कवितेच्या आविष्कार पध्दतीतले बदल हे वरील स्वरूपाचेच आहेत. डेव्हिड वॅगनरच्या कवितेबद्दल लिहिताना इझिकेल म्हणतात : "इथे ' स्व ' हा एखादा मुखवटा किंवा आविर्भाव नसला तरी स्वरनिरपेक्ष शोध आणि वस्तुनिष्ठ वेध ( किंवा दृष्टी ) यांच्या महत्त्वपूर्ण सुरापुढे तो लीन झालेला आहे."

कवितेचा ' कविता ' म्हणून विचार या दृष्टीने होऊ शकतो हे आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. कविता ही 'कविता ' ठरण्यास तिच्या स्वरूपात अमुक अमुक लक्षणे अपरिहार्य असतात असे समजत राहणे धोक्याचे आहे. या विवेचनातला इझिकेल यांचा ' काव्यात्म विचारीपणा ' ( ' पोएटिक रिझनेबलनेस ' ) हा शब्दसमुच्चय अतिशय महत्त्वाचा आहे. बांधिलकी ही स्वतःच्या भावनिक प्रतिक्रियांबद्दल जशी असते किंवा व्यक्ति -- समाज वगैरे द्वंद्वात्मक संबंधांच्या, कवीला जाणवणाऱ्या स्वरूपाबद्दल जशी असू शकते, तशीच ती ' स्वनिरपेक्ष शोध ' ( ' इंपर्सनल सीकिंग ') आणि 'वस्तुनिष्ठ वेध' (' ऑब्जेक्टिव्ह व्हिजन ') यांच्याशीही असू शकते हे लक्षात घेतले पाहिजे. मुळात ' बांधिलकी ' या शब्दातला घट्ट रचनेचा अर्थच इथे संशयास्पद होऊ शकतो. अशा प्रकारच्या कविता त्यांच्यांतील अ-भावयुक्ततेमुळे 'कविता' म्हणून स्वीकारणे अनेकांना अवघड वाटते. परंतु हे एवढ्यावरच थांबत नसून बदलत्या स्वरूपाचे हे महत्त्वाचे काव्योद्‌गार काही वेळा दडपले जाण्याच्याही शक्यता दिसत आहेत. आपल्या सवयींचा आपल्यावरील पगडा हा कवितेतील बदलत्या सहजाविष्काराला अडथळा ठरणार नाही याबद्दल जाणकारांनी तरी निदान जागरूक राहिले पाहिजे.

-- ४ --

' कवीची व्यक्तिविशिष्टता ही कवितेत किती महत्त्वाची असते ' हा प्रश्न हजारदा विचारात घेतला गेलेला असला, तरी या संदर्भातही त्याचे महत्त्व आहेच. आपल्याकडे दिलीप चित्रे, ग्रेस, ना.धों महानोर ही (आणि अरुण कोलटकर सुध्दा) व्यक्तिविशिष्ट ठळक कवितेची उदाहरणे आहेत. परंतु गुरुनाथ धुरींसारखे काही कवी निव्वळ व्यक्तिविशिष्ट प्रतिक्रिया संक्रमित करत राहण्यात फारसा रस न घेणारे आहेत. आरती प्रभू यांची कविता ही या दोन्ही प्रकारांना जोडणारा आधुनिक कवितेतला महत्त्वाचा दुवा आहे. 'अनुभवाच्या पक्व अवस्थेतून कविता लिहिणे ' आणि ' अनुभवाच्या पक्व अवस्थेकडे पाहत कविता लिहिणे ' या पूर्णपणे वेगळ्या अशा पध्दती आहेत. अनुभवात गुंतून, नव्हे, अनुभवातूनच आलेली कविता ही अधिक तीव्र आणि उत्कट असते हे खरे असले, तरी कविता म्हणजे ही एकमेव परिस्थिती असे काही नाही. अलंकरण, वृत्तबध्दता किंवा छंदोबध्दता, प्रतिमा, कवितेची चित्रमयता आणि नादमयता इत्यादींच्या हेकट अपेक्षा या निव्वळ फॉर्मवर आक्षेप घेत आहेत असे दिसत असले तरी अनेकदा हे आक्षेप मूलतः अनुभवाकडे पाहण्याच्या प्रक्रियेवरही असतात. ही जास्त धोक्याची बाब आहे.

व्यक्तिविशिष्टतेच्या बंदिस्तपणाचा आरती प्रभूंनी आविष्कृत केलेला ' शोध ' या संदर्भात पाहण्यासारखा आहे :

पृथ्वीची फिरती कडा चाटून
कवितेची एक ओळ येते
आयुष्याचा एक दिवस
दानासारखा मागून नेते

स्वतःपासून दूर जाता येते
आरशापर्यंत तेवढेच
हे शरीर आयुष्याने बांधलेले
त्या सूत्रालाही अदृश्य खेच

उभा जन्म पाठीमागचा उगाच
सूर्योदयाचा डोंगर वाटतो
पण संपूर्ण कवितेच्या शोधांतील
तोही एक सूर्यास्तच असतो

--या कवितेत आरशाशिवायही स्वतःकडे पूर्णपणे पाहण्याची एक प्रक्रिया अंतर्भूत आहे. कवीची शब्दकळा आणि रचना - पध्दती ही व्यक्तिविशिष्ट असणारच. परंतु संपूर्ण भानच व्यक्तिविशिष्ट असते किंवा ते तसे असणे अपरिहार्यच आहे असे समजणे मात्र चुकीचे आहे.

भावनिक ओलावा असणे, तीव्रता - उत्कटता असणे म्हणजे अपरिहार्यतः व्यक्तिविशिष्टतेच्या क्षेत्रातच फक्त वावरणे असे इथे सुचवायचे नाही. तसेच कविता विचाराच्या अंगाने गेली म्हणजे ती निश्चितपणे व्यक्तिविशिष्ट ताणातून मोकळी असलेलीच असणार असेही सुचवायचे नाही. परंतु वरवरच्या स्वरूपविषयक चर्चा करत राहण्यापेक्षा आजच्या अनेक कवींचे भान -- अवधानच काही वेगळ्या दिशांनी कार्यप्रवण होत असेल तर त्याची मुख्यतः दखल घेतली जावी, हे सुचवणे हाच या लेखाचा उद्देश आहे. काव्यलेखनपध्दतीतले जिवंत बदल अधिक समंजसपणे पाहिले जाणे आणि त्यांच्या प्रक्रियांची मुळापासून दखल घेणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीय किंवा सांस्कृतिक आलेखांच्या संदर्भात सदर प्रश्नांची चर्चा करणे प्रस्तुत लेखकाला कठीण आहे. परंतु या दृष्टीनेही या प्रश्नांचा विचार होणे उपयुक्त ठरेल असे वाटते. भावात्मकता किंवा नादमयता किंवा चित्रमयता यांच्या हेकट आग्रही भूमिकेतून हे बदल समजून घेता येणार नाहीत. आनंदभोग ( एंजॉयमेंट ) किंवा रतवृत्ती ( इंडल्जन्स ) या दृष्टींनीच फक्त विचार न करता वाचक -- टीकाकारांनीही शोधाच्या ( 'सीकिंग ' च्या ) अवस्थेतून काव्यानुभवाकडे पाहणे महत्त्वाचे आहे.

रूढ आणि स्वीकृत कविता पुष्कळ आहेत ; त्यांची उदाहरणे इथे देत बसत नाही. परंतु काही वेगळ्या मार्गांनी जाणाऱ्या कवितांची काही उदाहरणे पाहू. खरे तर त्या संपूर्ण कविता येथे दिल्या पाहिजेत ; परंतु बदलत्या स्वरूपांचा फक्त निर्देश करणे एवढाच उद्देश असल्याने त्यातील काही ओळीच देत आहे :

१ आता पुस्तके शोभेसारखी
वाटतात अधूनमधून,
तरीही पुस्तके नव्याने येतच राहतात
बदलत्या हवामानास अनुसरून.
त्यांना अधूनमधून हवाबदलासाठी
हलवावेही लागते
कपाटांतून माळ्यावर
माळ्यावरून ट्रंकेत
ट्रंकेतून पुन्हा कपाटांत.
ती बिनतक्रार तुमच्या सोयीने
नांदतात.

( 'पुस्तकांच्या संग्रहविषयी '-- सतीश काळसेकर,
' सत्यकथा ', डिसेंबर ७७ )

२ आम्ही निघालो
अन् उगवला मला असा एक क्षण
जो नव्हता माझी कोणतीच संख्या.

( 'अन् उगवला मला..'-- चंद्रकांत प्रभाकर देशपांडे,
' प्रतिष्ठान ', जाने - फेब्रु.७७ )

३ संहितेतली माझ्या वाटणीची जागा
कोरीच ठेवावी लागणार मला बहुधा

( 'संहिता' -- अनिल द्रविड, हंस, सप्टेंबर ७८ )

४.	कसली हुरहूर, कसल्या गोठीभेटी,
कसलं डोळ्यांत भाव वाचणं वगैरे
कसला एकांत, कसलं हे दिव्य
त्याग वगैरे
यांपैकी काहीच झालं नाही, केलं नाही
तरी पण सामोरी आली दाही दिशांच्या पलिकडची दिशा
कुठंही न जातां
अवचितपणं --
रोज भेटावंसं वाटतं म्हणून
कधीच भेटलो नाही आपण

( 'पोत '-- र.कृ.जोशी,'सत्यकथा',दिवाळी ६७)

५..	तिच्या डोळ्यांत पाणी आल्याचा भास झाला
पण तेवढ्यात ती  गर्रकन् वळली आणि चालू लागली.
पुढं मी नोकरी मिळवली, शहरांतल्या खुराड्यात
एक खोली घेतली, नवे संबंध जोडले.
या शहराच्या गतिमान जीवनाचा एक सूक्ष्म भाग झालो...
सर्व सोपस्कार अगदी शांतपणे केले !

मात्र कधीमधी अनावर झालं की
रात्रीच्या गडद काळोखात
अंथरूणात, नुस्ता गडबडा लोळतो
एखाद्या उद्ध्वस्त बागेत लोळणाऱ्या
बेवारशी कुत्र्यासारखा.

( ' बागेची कविता'-- गुरुनाथ धुरी,'सत्यकथा', दिवाळी ६७ )

६..	आता कुठल्याही दारी हे बेलाशक उभे राहतात
बायाबापड्यांकडून हळदकुंकू वाहून घेतात
झुलीमधल्या झोळीत पसाभर पडले की खूष होतात
आणि गुबुगुबु असे वाजताच तडफेने मान हलवून
धन्याच्या भरभराटीची ग्वाही देतात.

( 'नंदीबैल '--नारायण कुलकर्णी कवठेकर,
' सत्यकथा ', जून ७८ )

७.	तिला ऐकू येत नाही
किलबिलती पहाट
ओल्या क्षणांत
गुणगुणारी...
ती आहे
फक्त तिचं
अस्तित्व,
सकाळ,
दुपार,
संध्याकाळ,
रात्री...!

( ' ती '-- वर्षा देशपांडे,' अभिरुची ', दिवाळी ७७ )

८. साफ सांगतो
माझा मुडदेपणा मी मोडणार नाही
आरामखुर्ची सोडणार नाही
चेहऱ्यावरची माशी वारणार नाही
झोपणार नाही की घोरणार नाही
फार तर एखादी सिगरेट पेटवीन
आतल्या आत सगळी वाढ खुटवीन.

( 'आरामखुर्चीची कविता '--दिलीप धोंडो कुळकर्णी,' ' सत्यकथा ' , दिवाळी ७६ )

९. ...इथवर ठीक आहे. अजून फारसे बिघडलेले नाही
आपण जगतो आहोत ते याच जन्मांतले,
गेल्या जन्मीचे ते जगणे हे नाही
एवढे तूर्तास मी पक्के लक्षात ठेवले आहे

( ' बागेतल्या कविता '-- प्रभा गणोरकर, ' सत्यकथा ', दिवाळी ७६)

१०. वर्तुळांत शिरायचा
माझा चोरटा प्रयत्न
मी पाय उचलला
आणि बागेच्या माळ्याची सनातनी बोंब.
कारंजं केव्हा गपगार झालं ?
-- मी एकास विचारलं.
त्याने माळ्याकडे बोट दाखवलं
दुसरं खुर्चीकडे.
कारंजं हतबल
-- त्याच्या वर्तुळात.
माझ्या खुर्चीवर मी.
माळ्याची करडी नजर
सभोवार.

( ' चार तुषार : कारंज्याचे'-- अर्जुन कांबळे, 'सत्यकथा', दिवाळी ७७ )

११. फार फार थकलोय मी आता. हे जिवंतपणीचं मरण
एकटेपणाच्या थडग्यांत
नि पराभवाची भावना ...
तरीही समाधान आहे,
जे जपलं -- जोपासलं होतं ते अस्सल होतं, निखालस
शुध्द म्हणून दुर्बोध।
त्याची कुंडली मला दुर्बोधच राहिली
आणि कुणालाच ती कळू शकणार नाही एका
नियतीखेरीज. कधीच.
त्याला स्वतःला ती वाचण्याची इच्छा कधी व्हायची नाही
आणि ती वाचण्याइतपत त्याच्या निकट जायची हिंमत
कुणीही करू धजणार नाही ।

( 'वाघ '-- गुरूनाथ धुरी, 'सत्यकथा' दिवाळी ७७ )

-- वरील सर्वच उदाहरणे ही उत्कृष्ट कवितांची उदाहरणे म्हणून घेतलेली नसून मुख्यतः बदलत्या आविष्कारपध्दतीची निदर्शक म्हणून घेतलेली आहेत. हे नुसते गद्यलेखन किंवा गद्य ललितलेखन नसून, या कविताच आहेत -- मग त्यांचे मूल्यमापन काहीही असो. उत्कष्ट कविता या दिशेनेही असू शकतात -- ही शक्यता मान्य होणे महत्त्वाचे आहे. भावनिक ओलावा आणि परंपरागत लिरिसिझम ही कवितेची अविभाज्य लक्षणे नाहीत, एवढेच इथे सुचवायचे आहे.

-- ५ --

निसिम इझिकेल यांचा ' काव्यात्म विचारीपणा ' ( ' पोएटिक रिझनेबलनेस ' ) हा शब्दसमुच्चय आजच्या मराठी कवितेच्या संदर्भात विशेष विचारात घेणे इष्ट ठरेल.

माहिती, निवेदन, वास्तववर्णन या वरवर रुक्ष वाटणाऱ्या गोष्टी, त्यांना संसूचनशक्तीचा स्पर्श झाला तर अमर्याद अर्थाच्या वाहक होऊ शकतात. प्रदर्शनात्मक दृष्टिकोण टाकू पाहणाऱ्या अनेक नव्या कवींच्या कविता वाचताना याचे भान राखले जाणे आवश्यक आहे.

कवितेतील मजकूराची संसूचनशक्ती हेच फक्त कवितेचे अपरिहार्य लक्षण म्हणून स्वीकारता येईल ; हा विचार मान्य होण्यातच कवितेची असंख्य क्षेत्रे खुली होऊ शकतील ; नाही तरी बंदिस्त, हेकट अपेक्षा काळाच्या ओघात टिकणे कठीणच आहे.

कवितेतील ' अ--भाव ' हा आपल्या समंजसपणाच्या अभावामुळे ' अभाव ' वाटू नये.

**-- चं.प्र.देशपांडे.**

## सूळ

आकाशाच्या साक्षीसाठी
सूळ पुरातन रचिला आहे
मुळांपलिकडे असून सृष्टी
प्रत्यय वृक्षातूनच वाहे !
□

## झुंजुन गेल्या सरी

झुंजुन गेल्या सरी
नभाभ्रे उन्हात भिजुन वरी

भांडुन गेली परी
नभाशी पर्वतशिखरावरी

चिंबुन गेल्या लता
फटकुनी रस्त्याशी वाकता

भंगुन गेली शिला
साहुनी डोंगर भांबावला

सांडुन गेली निशा
दिसाला चढली जेव्हा नशा

स्फुंदुन गेल्या दिठ्या
बिचाऱ्या मेघांच्या एकट्या...
□

## गाज

गाज शरीरभर...जसा पाऊस ऐकतोय
उत्सव इतिहास असलेला प्रत्येकाची दिल्ली
फुटतोय गल्लोगल्ली बसतेय मांड्यांची खीळ
तितका स्फोटक दरोबस्त हड्डी नरम शेंदूर
दूर उभे राहून फक्त पहात रहा ...
तुमच्याही शरीरांत ऐतिहासिक द्रव असतीलच
पाऊससुध्दा एक आपला ऐकणारा सश्रध्द
या गंगेत तुमचेही गगन वितळून जावो...
मग आपण एका उत्कट स्फोटाची दर्दभरी अभिव्यक्ती करू
ईश्वर न्याय्य बाजूलाच राहील....
□

## बाप

विश्वस्त निधी की बरखास्त सभा की गूढात्म स्पष्टीकरण
सर्व लोक इहलोक की हयातभर यातायात की फक्त व्यतिकरण
आकाशाचे विडंबन की चालीचे अवडंबर, की दीर्घ पक्ष्यांचे रुदन
पूर्वजांचे औत्तरीय की वेगांचे स्थितिस्थापकत्व की नवजांचे समीरण
समुद्रांचे व्यापार की दिशांच्या तारा की लोलकीय किरण
तुकड्यातुकडयांचे गोल की धुरीणांचे बोल की शास्त्रीय निःशस्त्रीकरण
राजकारण समाजकारण धर्मकारण अर्थकारण नीतिकारण तत्त्वकारण
युध्दकारण सख्यकारण आदिकारण अंतकारण की कर्तव्य उष्णमरण

झनन झनन मोरी पायल बाजे...( वरचं ते सोडा,
ते आपलं उगीच...) कोयलिया बोले अंबु -- पिया गये परदेस
बंधनवा आ आ आ बाँधो रे S बाँधो ...
मैं क्या करूं राम मुझे बुढ्ढा मिल गया
हाय हाय ...

वरचे रण खालचे कसले तरी करण,
आपण आपले सगळ्यांचे बाप -- प्रसिध्द -- अमर...
□

## जाळं

जाळं टाकून कोळी मरून गेला आहे.
अडकलेली माशी धडपडते आहे.
आभाळ संथपणे पाहात आहे.
□

## घळी

माझ्या पुस्तकांच्या ओळींत भल्या खोल घळी असतात
गुहाळ अंधारांत ओल्या शेवाळ्यांचे वास असतात
दिसत नसलेल्यांचे आवाज भरभरत असतात
जे माझ्या डोळ्यांच्या खंदकांत उतरतात

भर दरीत धुके असावे तसे आयुष्य जात राहते.
□

## झाड

कावळ्याच्या आवाजासारखं बिनपानांचं झाड
पण पांढरं, मृदू आणि अक्रूर
राहू शकलेलं अजून
□

## मुक्तिसंग्राम

कोंडीत मनाचे किती असंख्य प्रकार
आणि सगळ्यांमागून अत्यंत
भित्रट आणि म्हणूनच तितकाच कडक
एक मुक्तीसाठी उतावीळ कर्मठ ताण

त्याच्या छातीतल्या रक्ताला नसते वाट
त्याची वासना केवळ उद्रेकाला टेकलेली
त्याची पानेफुले आक्रसून आभाळात कर्कश
आणि त्याचे रस्ते अत्यंत वेगात स्थिर

मधूनच जाणीवपूर्वक ताण सैल
आभाळ हळूहळू मोकळं
त्यातून सुटावी याचना स्वैर
तर मुक्तिसंग्राम हळूहळू पुन्हा हजर...
□

## कबीर

कंसात -- आम्ही -- एक स्वयंसिध्द सत्य -- कंस
पूर्ण, आता आम्ही आतले आणि बाहेरचे,
बाहेरचं वस्त्र, आतलं जाळं, वस्त्र, जाळं,
वस्त्र, जाळं, विणतोय, विणतोय, विणतोय,
ताणे - बाणे, विणतोय....
व्हेकंट शटल्स वीव्ह द विंड

वारा हलतोय, वारा बोलतोय, वारा
हसतोय, रडतोय, वासनेनं पेटतोय...
खेचला जातोय आत, होतोय बहिर्मुख,
गुंततोय बाहेर, आटतोय आत,
बसतेय खीळ, दातखीळ, रोवला जातोय
स्तंभ, सूळ, मूक स्तंभ, अचल, घट्ट,
अपरिहार्य, सक्त, जुलूम, दडप, दडप

कबीरानं काय म्हटलंय,
" राम हमारा जप करे हम बैठे आराम ! "
वाह .....!
□

## इमारत

तिची इमारत. उंच वाटतेच वा असतेच. अंधारात दिव्यांनी कोन दिसतात. छायाप्रकाशांचे तऱ्हेतऱ्हेचे. पैलू पाडलेली कोन्काच. दिव्यांचे रंगही बदलू लागतात वेगवेगळे. सप्तरंगी हिरकणीच. भीतीनं मधेच काच कापते. कापू लागते. हदरते ती. मजले कोन खळ खळ खळ. निखळतात, कोसळतात. काचा काचा काचा. खचते उतावीळ. घाईनं करू लागते गोळा. कोन कुठे कोन कुठे रंग कुठे. उभारायला हवे. पुन्हा पुन्हा. भयघाई. पहाट येते. चिंब दंवात. वारा गार. कंपायन. फुटके सूर्य झर झर झर.

□

## नसा मोकळ्या

नसा मोकळ्या
हव्यास मोकळेपणाचा
पड धपकन्
पाण्यावर
खा मनसोक्त मार
मार मुसंडी
ठार बहिरा होत
जा खोल
अन् मग बोल
अचानक तुझी आरोळी
पाण्याच्या तळाशी
ये मग वर
प्रेत होऊन
अन् मग म्हण नेहमीप्रमाणे
की एकंदरीत विचार करता
जग ठीक आहे.

□

## प्रवास

चालू थांबवणूक सोडवत नाही --
एकाच फलाटावर चालतो -- चालावा वाटतो --
-- अजाणता --
(दीर्घ ) प्रवास
अन् तिथेच येऊन जावी अनेक गावांची नावे.
एका गावाचे नाव असते ' प्रवास '
तेही बनते एक फलाट
त्याच फलाटावरील.

□

# कालयंत्र

कालयंत्र मिळाले तर पुढच्या
पिढीचे बगलबच्चे मागच्या
पिढीत उतरू शकतात

म्हणजे मरून गेलेल्या माणसांच्या जिवंत आयुष्यांतही

म्हणजे पुढच्या म्हणजे मागच्या बऱ्याच काळाला
बगल देऊन पुढचे बच्चे आत्ता इथे टपकू शकतील

तसे झाले
तर आत्ता आमचा जिवंत असण्याचा काळ
की आम्ही मेल्यानंतरच्या आधीच्या
आमच्या जिवंतपणाचा काळ

म्हणजे ते इथे येऊन आम्हाला आत्ता ठार करू शकतील
आणि तरीही
आम्ही आमचं पुढचं आयुष्य जगलेले असू...
किंवा ते आल्यावर आम्ही त्यांना ठार करू
पण त्यानंतर कदाचित त्याच्याही पुढचे
येऊन त्यांना वाचवतील अन्
आम्हालाच मारतील आणि त्यांना
आपल्यांत घेऊन जातील कदाचित आमच्याही
आधीच्यांच्याबरोबर
वा
आम्ही हरलो असलो तर आम्हाला वाचवतील
म्हणजे आम्ही एकदा जिंकलेले असू अन्
एकदा हरलेले तसेच मेलेले अन् जगलेले
किंवा तसेच तेही मधले
नाहीतर कदाचित सगळेच
यंत्र फोडून
आभाळात राह्यला लागू

म्हणजे गर्दी होण्याचाही प्रश्न नाही.
□

## पर्याय

मी काठाजवळून
आत शिरतात कधी कधी वाहते हात
एरवीचं मन अपारदर्शक
वाळू दूरवर पसरलेली अंधारात
माणसांच्या पलिकडचं अदृष्टच सारं
आठवतात याच वाटेनं गेलेली माणसं
वा याच हातांनी हलवली गेल्यासारखी
संपूर्ण जलमयही झाल्यासारखी.....झालेली...
त्यांचे चेहरे मात्र आठवत नाहीत
आठवतात पण चेहऱ्यांहून खूपच काही
काठांचा पूर्वपरिचय डोळ्यांच्या भूतकाळात
माणसं....एक....एक....जलमय संपूर्ण
पारदर्शक
आठवत नाहीत म्हणूनच नुसते त्यांचे जलतरंग...
दिसलेले त्यातून वा जाणवलेले अथांग अस्तित्व
माणसांच्याही त्या पलिकडचे
ते फक्त स्वतःच झाले पारदर्शक
जलमय अथांगासाठी अंधारात
वाळूची पावलंही जेव्हा सागरी झाली
वाळूतल्या माणसांनी जेव्हा आपली पावलं मोजली
माझं माझ्या अहंकाराएवढं पाऊल कोसळलं कधी तरी
झोकला गेलो न कळत अथांगात
जाणवलं आणि घुसमटू लागलो गटांगळत
आपण काठाजवळ असल्याचं लक्षात राहिलं तेव्हापासून
मी काठाजवळून....
आत शिरतात कधी कधी वाहते हात
एरवीचं मन अपारदर्शक
कधी कधी होतं विचारांचं एक चाक
जातं ओझं होऊन घसपटत खळपटत पाण्याशी
वाळू दाट होत जाते जेव्हा वादळाहून
माणसांचे चेहरे गोठतात ज्या स्थितीत
आणि एक सत्य प्रकर्षानं जाणवतं पुन्हा
मधली घर्षणरेषा नष्ट व्हायची असेल
तर
एक तर संपूर्ण जलमय व्हायला हवं
नाही तर संपूर्ण वालुकामय
आणि दुटप्पी पर्याय थिजून जातात...
□

## या ओळी

कित्येक आवाजांनी सुरू होताहेत या ओळी
सूर्य चंद्र तारे पृथ्वी ग्रह उपग्रह खरे खोटे कृत्रिम
विक्रम, उन्नत भुवयांना झालेल्या जखमा
श्रमबाहुल्यातून उद्‌भवलेल्या नजरांच्या
रत अविरत हितहितांच्या सुखत सलत चाली

माध्यमांच्या मध्यस्थीतून एकमेकांचे संक्रमण
आक्रमण वा पराभव -- बाकी तख्त मनाचे सक्त
विरक्त बैराग्याचीही झोळी भरून दहा दिशा
आशांचे मध्य असे वर्णतोल सावरत
वावरत आपापल्या पावलांनी देत....घेत

कक्षा अशी आंस तसे प्रवासातच अंत
तख्तावरती आवाजांची कारकीर्द इतिहास
व्यक्ती अनेक विश्वे अशी भरून झोळ्या
मोळ्या असल्या रचल्या मध्य असे कित्येक
आदि -- मध्य -- अंत ओळींची भलीबुरी रपेट ...
□

## फ्लॉप

प्रकाशात उगवत्या
भन्नाटलेली रात्र थकून

सुन्नावत विरत जाते
हळूहळू. ती बसून,

तो उभा. शून्य विचारतो,
'' कोण भितंय ? या लाल

सूर्याला कोण भितंय ?"
हुंदका पुसत ती म्हणते,

''मी.''  दृष्टी स्थिरावत,
हरवत, "मी."

वेली प्रकाशतात. फुलं
फुलतात. काचेतून आत.

गळाठतो तो थकून.
प्रकाशकिरण पडतात

त्याच्या डोळ्यांवर. पण
त्यांना स्पर्शच जाणवत नाही.
□

## एवढंच

तो जखमी कावळा डोम आहे.
जरी ऑफ मेनी कलर्ड ग्लास नसला तरी
त्याचं शरीर त्याच्यातल्या चलतत्त्वाचं वसतिस्थान
पण त्याचं आयुष्य शाश्वततेच्या शुभ्र तेजाला डागाळतं हे खरंच
एकच डोळाही चोचीमागचा केवढ्या भयंकर
त्वरेनं हालचाली त्याच्या माना वेळावीत एरवी
त्याचाच पंख लोंबतोय आता केविल निर्जीव
उड्यांवर भागवावं लागतंय स्वसंरक्षण
डोळाही भीतीनं भयंकर घाबरलाय
कुळकुळीत क्रूर भयाण थरथर
रंगीबेरंगी काचांसारखी चकचक थरथर
म्हणजे शेलीचं बरोबरच
नाहीतर त्या वाघासारख्या शेलीपुढं
या कावळ्याची शेळीच होऊन गेली असती...
कारण हा कावळा जखमी डोम म्हणजे फक्त कावळाच नव्हे
कुठलाही प्राणी जखमी मुख्य म्हणजे माणूस
जखमांची रूपं खड्डे वा टेंगूळ
कित्येक कावळे जखमीच असे
त्यातला एक हा डोम
कुठल्याही मेंदूवरच्या चकमकी म्हणजे काचाच
व्हाईट रेडिअन्स ऑफ इटर्निटीवर कवडसे टाकत
उदाहरणार्थ म्हणून हा एक आपला ठळक
( एवढंच...कोटच्यांबद्दल माफी असावी...)
□

## तीन स्वर

**कुमार गंधर्व**

शांत वाळवंट
एक प्रवासी ठिपका
दूरवरून येणारा काळ
काळाबाहेरून अनादाला आकार देणारा
वाळूच्या लहानमोठ्या ढिगांचे आकार असलेला
झोत खंड वारा

**भीमसेन जोशी**

प्रचंड पावसांत भिजलेला
भलाथोरला वृक्ष
अंधारालाही चकित करीत जाणारा राजमार्ग
बेहद्द झोकू शकणारा
स्वतःला वाटांच्या निबिड जंजाळात
दाट...लख्ख...निःशंक...
आजानुबाहू

**सैगल**

वाऱ्याने उडून जाणारी जीर्ण पाने...
मातीवर दृष्टी खिळलेला
एका उजाड माळाभाळावरील स्थिर पक्ष्यासारखा
सैल सर्वस्व भर...
असंख्य आयुष्यं होऊन गेलेला काळ...परका...

□

# असंतसं

सगळ्या वस्तू, शरीर, संबंध, वगैरे
आमच्या अस्तित्वाची ललकारी म्हणजे हे गुंते
कंगव्यासारखं एकेक घर स्वच्छ करावं तर कठीण
कवडशांसारखं उन्हाच्याही भेगेभेगेत मालिन्य
उद्यानांच्या रोपावृक्षांनी खरवडलेलं आभाळ
मधूनमधून सांडलेलं चिखलाच्या हुंदक्यांसारखं क्षणांवर मन
कोपरेही सगळे सवयींसारखे उपरे रप्प चिकटून अंतर्बाह्य
रंग, आवाज, स्पर्श...आम्ही, ललकारी -- असंतसं
तिचा मात्र शब्द नाही, नाद नाही, रूप नाही...

□

# खुळे चार

खुळे चार चाळे पाच दिवस सगळे आयुष्याचे
पहिलं दान देवाला -- उरली चार भुतांना
पाचवं भूत पछाडतंय -- आपलं शीत मागतंय
देव आपला अनंत -- आम्ही आपले जिवंत.

□

# तसा काळ...

पिवळ्या पानांवर भरतेय मंद उन्हांची संध्याकाळ
आकाशदिवे हलताहेत त्यांच्याइतकेच डोळ्यांसमोर त्यांच्याएवढे
कित्येकांची आयुष्यं विसावत असतील निग्रही
इंद्रियांच्या प्रश्नार्थक रचनांत
कित्येकांनी उलथले पालथले असतील कसकसले खाने
रक्ताळ बिछायतीवर विसावत
अंधारप्रसव दिव्यांवर उधळले असतील कित्येक
पतंगी काजवे शहरांत खेडोपाडी
जनावरांच्या तीरस्वार निष्ठा भोगल्या असतील
अरंध्र कवडांच्या पुरंध्र वाड्यांनी
अनावृत आषाढांवर बरसले असतील मोहोळी
मेघांसारखे मोटारी झोत
अनंग गढूळतेत काहींनी उसवले असतील त्यांचे
भूस्तर चिंध्यांचे अविकासी डोळे
विचार भावना कल्लोळ कांक्षा स्थिरवता चाल खोल
वर जवळ दूर धूर धूर धूर
पानांवर भरतोय जमेल तेवढा तसा काळ...

□

## उंच शिखरावर

उंच शिखरावर चढून दिली एक बांग
बापाला,
विचारला अवस्थांतरांचा प्रगत मनाला धरून अर्थ ;
त्यानं उघडलेलं तोंड उत्तरासाठी नव्हतं,
होतं ते स्वतःच्याच निर्मितीप्रक्रियेच्या प्रगत
थिऑरेटिकल आणि प्रॅक्टिकल शोधात ;
तो म्हणाला, " ही वर्षानुवर्षांची प्रॅक्टीस आहे."
-- उघड्याच तोंडानं,
पोरानं पेशंटसारखी औषधाची बाटली
घातली खिशात ;
चढला दुसऱ्या एका उंचीवर पीत पीत,
त्याची करपट पिवळी उचकी पान होत होत
त्याचाच झाली बाप ( अपान )
□

## व्याघ्रमुखी

काळा आसमंत, श्वापद, चीत्कार, रक्त,
ओघ, मांस, माती, ठसे, वेग, आसुस, आघात
...मध्यान्ही व्याघ्रमुखी सत्याची आळवणी.
□

## अनुवाद

आपण असतो. आपल्याला. दुसऱ्यांना. इतरांना.
बोलणं वागणं या माणसांचे अनुवाद करायच्या गोष्टी.
कधीकधी उगीचच काहीतरी. मग चुटपुट. तेच.
एकदम हल्लक निरर्थक किंवा असंच. इतरांना
म्हणजे तेच. नाहीतरी आपलं वेगळं अस्तित्व असतंच कुठं...

तसं म्हणजे सगळंच. जाऊं दे. आपण पण आणि इतर पण.
हे मेले की ही दोरी पुढं धरून नेणारे दुसरे येतील.
थोड्याफार बदलांनी. मग ते पण. त्यांचं पुन्हा तसंच.
मग पुढचे पुढचे महत्त्वाच्या दोऱ्यांच्यांच्या दोऱ्या धरून ठेवीत राहतील.
पण म्हणजे तशा त्या दोऱ्या म्हणजे तेच. तर जावो...

असं म्हणून चाललं असतं तर बरंच होतं. आत्ताचं काय ?
एकमेकांचे अनुवाद होतच असताहेत तर मनाचं काय ?
समजा सगळं खरंच गेलं तर मग आपण म्हणजे अगदीच
करकरीत असं वाटत राह्यचं एखादेवेळेस...म्हणजे विचार
म्हणजे अनुवादवाल्यांचे हे आमचेच...कठीण... तर जावो हेही...
□

## झाडाचा चिवचिवाट

झाडाचा चिवचिवाट -- चिमण्यांचं झाड
व्हावा जसा देही रोमांचकिरणांनी
सूर्योदय त्यांच्या -- झाडाच्या पानी
हिरव्यागार हिरव्या
किरणांचा मंजुळ स्फोट...
□

## फुटत नाही

अशीच एक शिंक येते
फुटत नाही चालूच राहते
...तिच्यावर काबू नसतो
                    या शिंकेचं तिला भय
फुटत नाही चालूच...
                    फेंदारलेले नाक
                    आक्रसलेला चेहरा
                    तिरसटलेले डोळे
राहात चालूच...
                    ...अशा अनेक.
□

## उस्कटता विस्कटता

उस्कटता विस्कटता फासात गेलो पडत
फशी, हळूहळू सोडवावी एकेक गाठ
तर आवाठात उधळत्या पाकोळ्या राठ
तरीही म्हणालो हरणार नाही, असाच
जाईन पोटात जोसात शेवटच्या पिसाच्या

पिसाला होते केसाळ दात, जिभेला
त्याच्या दिशेरी टोक, माझी फडफड
रुतत गेली, उघड्या चोचीनं वासले डोळे
आरोळ्या ठोकल्या सांजभर तडफडून
राखट आभाळात चिर्रर चिर्रर

एकेक ढग पिंजावा म्हटलं, शेवटच्या
पोटात आभाळ सापडेल, पाहातो
तर पाठीवर ढगांचे थप्पे एकावर एक
तरीही म्हणालो हरणार नाही, असाच
उडवीन पिसांचे क्षण ढगांपल्याड...
□

## पियानो

मस्तकोच्च अस्तित्वबिंदू फुटतो अंकुरांसारखा
सुध्दा शरीर किंवा एकच
आठवतं
पियानोतून शिथिल टपटपणारी मिनिटं ठिपक्यांसारखी ओघळ
कोरड्या केसांची व्यसनाधीन ओठांची ताम्रदृष्टी
पाहात
फुटलेल्या  पियानोत विनष्ट ठिपके
अज्ञातातल्या अनंत सुरावटींचा अनाद पियानो...
□

## मी पाहतो

मी पाहतो माझ्यात, मला दिसतात
माझी लोक-मान्यामान्य चित्रं,
माझ्यापुरता मी रेषांच्या संख्या-तऱ्हांपुरता
वेगळा, न तुटणाऱ्या किंवा तुटणाऱ्या पिकं
तणावांनी रोड, विजेसारख्या लख्ख
उत्फुल्ल उत्पलाचं एक रेंगाळणारं जून चित्र,
मागून पुढून त्याच्या सेंट्स, झकाकी, पॉश,
माझी आत्मगत गजबज-कुजबूजसुध्दा लाजेकाजेनं,
...यांचंही समर्थन करायला समर्थ आहे मी,
'उत्तुंग देशांच्या सरहद्दी पाहीन ' पर्यंत
आहेत मी काढलेली चित्रं माझ्यातून
तीसुध्दा सार्थ...पुन्हा
पुन्हा मी पाहतो माझ्यांत, मला दिसतात...
□

## लांब लांब गेलो

लांब लांब गेलो
खांब सोडला नाही

रंग-दंग झालो
काळ पडला नाही

उदयाला आलो
अस्तलोच नाही

होकारांनी मेलो
नकारलोच नाही.
□

## केसर

हे प्रश्न थिजलेल्या गार डोळ्यांनो
तुम्हाला ऊब हवी असेल
तर या फुलांचे केसर परिधान करा

हे डोळ्यांनो उबेची अपेक्षा असण्याइतपत
तुम्ही जिवंत आहात काय ?

हे केसर म्हणजे स्वतःचे निर्मितिरूप रोमांच...

हे गार फुलांनो तुमचे प्रश्न पेटवा...
पहा

अंतर्बाह्य फुलत आहेत ते तुमचेच डोळे...
□

## गणती

संथ तोकड्या निरुद्देश्य अशा झोपडीवर
चंद्र चढत जातो आहे
निर्मनुष्य वाटेवर दूर
मऊ मंद वृक्ष....कळतो आहे
हलतो आहे एक वड दुरून
झोपडीवर निरुद्देश्य पाहात ...चढता चंद्र
वर्षांची गणती रात्रीत विरते आहे...
□

## पुतळा

अधांतरीच हे छप्पर
अधांतराइतकीच जवळीक

खूप खालच्या लांबुळक्या रस्त्यातून
रस्त्याइतकीच अरुंद रहदारी

काचेतून दिसणारा अर्धा काळा चेहरा
चेहऱ्याइतक्याच सचिंत मुलाचा

तुकड्यातुकड्यांनी घडवलेला जगाचा पुतळा
स्वतःइतक्याच बेलय गतीचा...
□

## अंधाराची भेंडोळी

अप्रकाशातून अंधाराची भेंडोळी फेकत - फेकत
डोळ्यांनी टाकलेल्या चित्रविचित्र फूत्कार ध्वनींना
असंख्य टेलस्टारांतून परावर्तित करीत
छायांच्या राज्यातील फुटकी वर्तुळे
कशी लांब -- लांब जात राहतात सुरकुत्यांसारखी...
जात येत फेकत झेलत फाकत जातो थरथरता झोल,
असंख्य खोळ्यांत भरत राहतात फुटक्या-भंग खुणा,
पृथ्वीवरून सरपटत राहतो काळ अणुस्फोटांच्या भयातून...

कित्येक राडारांना कळते आकाशातल्या
घर्षणक्षेत्राची वाढती व्याप्ती.
प्रतिक्रियांच्या प्रचंड जंजाळातून
भळाभळ भुसनळ्यांत गुदमरत
असंख्य इतिहास भडाभड घशांतून,
कानांचे पडदे फोडून,
अंधारांना फाडत,
अंधारांतून...
□

## लोक

लोक म्हणजे रंगीबेरंगी लोलक
लोक म्हणजे लोकलच्या फुटबोर्डांवरील
उभे असलेले घड्याळांचे काटे -- दोनदोन इंच पायांवर.
लोकांच्या रंगांना ' रोज ' चा वास असतो.
लोकांच्या डोळ्यांवर सावांची कातडी असतात.
रांगांच्या लोकांच्या पोटांवर बेंब्या असतात.
लोकांच्या शब्दांवर मुक्यांच्या खुणा असतात.
घरट्यांना लोकांच्या खिडक्यांचे गज असतात.
कपाळांच्या बोर्डांबरोबर फूटभर आशाही असतात.
मागे, पुढे, डोक्यांवर, पायांखाली --
सगळीकडे शेपट्या असतात.
त्यांच्या कलांनी ते जात असतात.
त्यांच्या कलांनाही कल असतात.
त्यांना सगळं काही कळतं.
जे वळत नाहीत त्यांना ते वळवतात.
त्यांच्या पळण्याला एक फिलॉसॉफी असते.
त्यांच्या पाळण्यांना पाळीव प्राण्यांसारख्या दोऱ्या असतात.
त्यांचे प्राण चारचौघांप्रमाणेच कुड्यांत असतात.
( कधी येतात. कधी जातात.)
नेताना चौघेच लागतात.
नेत्यांना बरेच लागतात.
लोकांचे बहुतेक बरे चालते.

त्यांचे हेतूही चालीबाहेर असत नाहीत.
बाहेरचे बाहेर राहतात.
आतलेही बाहेरच असतात.
सगळेच हेर असतात.
सगळ्यांचेच गळे कापलेले असतात.
सगळ्या पेल्यांत गाळ असतो.
-- सारांश, लोलक हे लोलक असतात.
( " पाहावे तसे दिसतात " )
. लोक हे लोकच असतात.
दुसरे -- तिसरे कुणीही नसतात.
□

## ती !

अंधारात कंदिलाजवळ ती उभी असते.
प्रकाशालाही असतो अंधाराचा वास.
चार भिंतींच्या वर असते एक छप्पर
कित्येक वर्षांपूर्वीच्या कौलांचे.
किरण फक्त पुनरुच्चार करतात
कोंदट अंधाराचा.
ती पाळण्यात आली तेव्हा सूर्य उगवत होता.
सूर्याभोवती कुणीतरी स्वप्नफुले गुंफली होती.
...प्रथम ती रांगायला शिकली.
मग आला पांगुळगाडा -- त्यानंतर
कुणाचे तरी बोट.
कसल्यातरी विचारांचा अंगठा जडली
तिला सवय चोखायची
आणि अंगठ्याने उकरायची
त्यासंबंधित माती
...ती चालू लागली होती.
तिच्या अवखळ चालीत उथळ पाण्याचा
जोश होता, नंतर सरितेचे पाणी
नेऊ लागले पुष्कळ गाळ वाहून
दिवस आणि रात्र यांतून
किनाऱ्याच्या आधाराने.
अंधाराने तिला केव्हा पाहिले
ते तिला कळले नाही.
एके दिवशी अचानक तिच्या
तो दाराशी उभा राहिला
आणि एक डोळा मिचकावीत म्हणाला,
" उरलेली वाट सोबतीने चालू. "
प्रथम ती घाबरली. मग गोंधळली.
आजपर्यंत उगवून गेलेले दिवस
तिला आठवले...तिने फक्त --

डोळे मिटले....तरीही तो
तिला दिसतच राहिला --
तिच्याकडे पाहात असलेला.
एक दिवस उगवला -- अन्
तो पसार झाला. त्याची सारी पापे
तिने आपल्या पोटात घेतली होती.
तिच्या वाटेवर -- तिच्याबरोबर
अंधार चालू लागला होता
-- तिचे काळीज काळे ठिक्कर पडले
ठिकऱ्या उडालेल्या मनासारखे.
जग म्हणजे काळ्या रक्तपिपासू ठोकरी
-- ही तिची काळाइतकी अटळ -- दृढ
भावना अरण्यरुदनासारखी वाढू लागली.
-- रानटी झाडे दाखवीत राहिली सहानुभूती
जागची न हालता.
ती अंगठ्याने उकरीत राहिली माती
रखडत...खुरडत...
खुराड्याच्या भिंती फुटलेल्या कौलांच्या
कंदिलाच्या काजळलेल्या काचेसारख्या
-- तिच्या सारख्याच उभ्या
कित्येक वर्षांसारख्या कोंदटत
...अन दिवसाबरोबरच कोमेजलेली
कुणीतरी गुंफलेली फुले...
...ती उभी असते
फक्त पुनरुच्चार करीत
...अन काळ...
□

## हळू हळू

कळत असूनही सर्वनाशाकडे जाणारा
एक माणूस मला माहीत आहे
फक्त आपण आपल्याकडे पाहिलं
की आपला नाश भस्मसात होतो
हे त्याला माहीत आहे

तरीही रंग पाहून त्याचे डोळे
आणि शरीर घनघोर होतात
आणि अगतिक झाल्याप्रमाणे
डोळे केवळ स्थिर होतात
आणि स्वतःचा नाश, केवळ जाणवून घेत राहतात
हळू हळू हळू हळू हळू .....
□

## चेहरा

डोळे म्हणजे त्याचा चेहरा
दग्ध त्वचा स्वस्थ पण ससंज्ञ
खोलातून
निश्चित् वस्तूहून आभाळ
संवेधणारा चेहरा,
वरवर पाहताही एक
कालातीत भीती दिसते
कधीकधी --
आतलं आभाळ गोठल्याची खूण
आणि त्या वेळी
ती अकारण कार्यस्वरूप अस्वस्थता
चेहऱ्याबरोबरच चेहऱ्याच्या
प्रेक्षकालाही मुरगाळीत जाते
पाहता पाहता
चेहरा आक्रसतो
प्रेक्षकही आणि त्याचे डोळेही...
हे ते डोळे पाहू लागतात
नकळत म्हणजे कळून
आणि विलसू लागते त्वचा पुन्हा
विदग्धत क्षणेक्षणी
भीतीतूनही डोळे झालेली...
□

## निष्ठुर असा हा

निष्ठुर असा हा काळमुलुख...अन् संध्येचं मलिन मुख
वाघुळाहून लोंबकळती अशी ही झांप दरी
आकाश लपेटून घनदाट असे पाठीवर केस
त्यांत चमकणारे किडे...
रक्तशोषित बोकड ओरडतो आहे
आणि
मगरीच्या मार्गात सुरा ठेवून
आफ्रिकन वाद्यं डमडमत आहेत...
□

## पुनःप्रयाण

स्मृतीतला अग्नीही शमवू शकतो
केंद्रित दाह.

स्मृतीतला अग्नीही होऊ शकतो
वर्तमान भविष्य.

स्मृतीतल्या अग्नीतही असते
एक गगनभेदी किंचाळी,

एक शांत तुटक चिता,
एक निरास मलूल फुलबाग.

स्मृतीतली फुलेही उधळली जाऊ शकतात
विकेंद्रित देहावर.

अन् स्मृतीतले देहही करू शकतात
एक पुनःप्रयाण...
□

## शत्रू

दुसऱ्या कोणाच्याही स्वातंत्र्याची आक्रमणं
वाटतात मला तुरुंग

माझ्या मर्यादेतच
माझ्या स्वातंत्र्याचे उद्‌गार...
...ज्यांच्या व्हाव्या ठिणग्या
आणि पेटावे वन्ही
आणि व्हावा समावेश
अनेकांचा माझ्यात...
...आणि ठरावे माझे स्वातंत्र्य थोर.

मला अज्ञात
अमर्याद स्वातंत्र्य,
म्हणूनच कोणत्याही तुरुंगाविरुध्द
माझ्या किंचाळ्या,
आणि हुशार सदभिरुचिसंपन्न धीरोदात्त
अश्रुपात.

स्वार्थलोलुप, गोंधळलेले,
क्रौर्याचे केवळ दुसरे रूप असलेले
आम्ही महान उद्‌गाते.

आमच्या शत्रूंप्रमाणेच
आम्हीही विचारणार नाही कधीच
आमचे स्थैर्य ढळवणारे प्रश्न.

मुत्सद्दीपणे हाताबाहेर ठेवलेली
ही हातमिळवणी.
□

## भूमिका

असताना माझी भूमिका सर्व पाने ओरबाडलेली
आले काही पांथस्थ. आम्ही भेटलो.
ते पाहताच माझ्याकडे झाले चकित.
" हे असे कसे काय ? माणूसच आहात तुम्ही ? "
त्यांनी विचारले मला.
" म्हटले तर होयच." मी म्हणालो.
" इतके रुक्ष असूं नये. विनाकारणच
उभी राहतात इतरांपुढे आत आत
दडपलेली त्यांचीच रूपे. समाजविघातक
अस्तित्व म्हणून तुमचा नाश केला पाहिजे."
या त्यांच्या निर्णयावर गेला
दहाबारा मोटारींचा एक धुराळ्याचा तांडा.
जाडजूड बाया. खूप सामान आणि
पान खाल्लेले पुरुष. सुस्त.
" करा." मी म्हणलो, " माझी भूमिकाच
तशी आहे." आणि अचानक
दाटून आली माझ्यात माझीच कणव.
पाहताच ते ताबडतोब झाले मायाळू
अन् म्हणाले, " माणूसच आहेस
रे बाळा तू, माणूसच आहेस.
तुझे हवेनको दुखलेखुपले बघायलाच हवे. "
आणि सहजच पुन्हा येऊन आपटलो मी
माझ्या मूळ भूमिकेवर की मनुष्य
नसतो कधीच प्रेमळ.
□

## युध्द

' तुम्ही माझे मित्र असाल
तर शत्रूही आहात '
असे म्हणताच घडली प्रचंड प्रतिक्रिया
झाली खूपच पडझड आणि
हवाले निघाले शब्दकोशांचे

' कोणताही कोष फोडल्याशिवाय
आयुष्य सुरूच होत नाही '
असे म्हणताच आल्या तर्ककर्कश किंचाळ्या
आणि झाले
काही ना काही पटवून देण्याचे प्रयत्न

'पटणे किंवा न पटणे हे समानार्थीच '
असे म्हणताच काही मित्रशत्रू भांबावले
काही झाले दिङ्मूढ अन् काहींच्या
आले लक्षात की आता
युध्द सुरू करण्याची वेळ आलेली आहे.
□

## रूप

सतत खरचटत चिडचिडत तणावलेला
होतो मी प्रदूषणवादी.
नदीकाठी गेलो तेव्हा शांत
निसर्गही मला झोंबत होता.
मला आवडण्यासारखे या जगात काहीच नाही.
एखाद्या आवडत्या स्त्रीला मिठीत घेऊन
आयुष्य बाहेरच्या बाहेर संपवता आले असते
तर बरे झाले असते. या विचाराबरोबरच जवळजवळ
एक सुंदर स्त्री समोर आली.
ती ज्याला आवडत होती तो पुरुष
मागून येऊन पुढे गेला. थबकला.
ती फक्त माझ्याकडेच पाहात होती.
निसर्ग इतका उघडा, इतका एखाद्या
भयानक घटनेची वाट पाहात असल्यासारखा,
इतका शांत, तटस्थ कधीच नव्हता. `
तिच्याकडे पाहता - पाहता माझ्या चेहऱ्यावरचे
ताण कमी - कमी होत आहेत असे मला वाटले.
हा माझा अपमान होता.
माझ्या सवयीच्या रूपाची हत्या होत होती.
मी पाठ फिरवली आणि चालत सुटलो.
नदीच्या काठाकाठाने.
पुढे चिखलातून...
□

## आयुष्यमान्

भिंतींचे रंग, तावदानं, रस्ते.
माणसं, हवामान अन् मी
एक बचावकर्ता --
माझ्या टिकाऊ मर्यादांचा भयभीत स्वामी
-- जबाबदार, कर्तव्यदक्ष अन् कमकुवत.
मी रिकाम्या जगात राहू शकेन ?
मी भरलेल्या जगात राहू शकतो ?
की सर्व पेल्यांतले अपघात माझ्याच ओठी ?
भिंतींचे रंग, तावदानं, रस्ते
...माझे मला वाहू द्या सजाण भार
रक्षणास बेभरवशी माझेच संभार.
मी जरी जगलो नसतो
तरी इतर कित्येक जगले असतेच
किंवा नसते.
आम्ही सर्व एकमेकांचे आंतर्बाह्य भाग आहोत
की नुसतेच आपले गतिहीन बेशुध्द ताण आहोत ?
जपून - जपून जाईन कुठे ?
अंधाराचा काठ तर सदोदित हाताबाहेर.
मी माझ्या हातात
केवळ हाताबाहेर --
हे आयुष्य !
आयुष्यमान् भव !
□

## वस्तुस्थिती

उघड्या आकाशाखाली आलो बाहेर लख्ख उन्हात
आणि माझ्या रक्तपिपासेची वस्तुस्थिती हरवली...

माझ्या शर्टावरचे सगळे डाग कुठे गेले ?
क्षणभर अवाक् झालो. इकडे तिकडे पाहिले.

दूरवर लोकांनी कसली तरी रांग लावली होती.
ओरडलो, ' अरे, इकडे या, इथे काहीच नाही,

न तिष्ठता मी इथे आहे, माझा शर्ट
पाहा हा प्रकाश डोळ्यांवर पडताच किती स्वच्छ ! '

छरे मारून उष्ण तडफडते पक्षी पाडावेत
तसे माझे शब्द रांगेच्या इतस्ततः पडले.

माझे खिसे रिकामे होते, आणि डोळेही.
खूप लांब मी उभा होतो. मग मी मागे पाहिले नाही.
□

## प्रातःकाल

इंजिनाच्या शिट्टीने पक्ष्यांनी डोळे उघडले
तर त्यांना पुरेसा उजेड पडल्याचे दिसले
आणि ते आकाशांत झेपावले तोवर अनेक
उद्योगपती आपापली स्नाने आटोपून
उदबत्त्या लावण्यात लीन झाले होते...
मोठ्यांच्या दिवाणखान्यांत बसून त्यांची
वाट पाहण्यासाठी छोटी माणसे घराबाहेर पडली होती
...अनेक करारपत्रांचे मनसुबे मग्न होते...
सर्व मानवी कायदा आणि सुव्यवस्था यांचा पायाच
असलेल्या सूर्याचे सर्वच आभारी होते...
" मानवी आयुष्य एखाद्या अकल्पित महाप्रचंड
संदर्भात पाहून त्याची हेटाळणी करू नका --
वस्तुतः ते भव्य आहे आणि दिव्यही ..."
टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने पक्षी पुन्हा उडाले
तेव्हा कुठल्याशा यंत्रावर तुटून पडलेली बोटे
गोळा केली जात होती...गोठलेले रक्त जसे
गृहीत धरता येते तशाच सर्व विशिष्ट
परिस्थितीही...
प्रत्येक चोचीबरोबर तिचे अन्नकणही जन्म पावतात
असे म्हणत राहून तरी काय होते...
□

## पिसे

पिसांचे आकार, रंग
दिसतात, जाणवतात
आकारांजवळ, आकारांवर
आकारांच्या आत, आतून
अनेक आकार,
रसायनांतून तिसरे, आणि असंख्य...
...उजेडातले आकार
पिसांच्या रचनांचे -- पुढे, आत
गतीत हळूहळू अंधारात गेलेले --
तिथून पुढे गडद अंधार
अंधारात अंधारत गेलेला...
आकारांना आकारांचीच फक्त गती...
...पक्षी फक्त अलीकडेच
पिसांच्या...
उजेडाला धरून
अंधारांत रोवलेली
सर्व पिसे...
□

# एका नात्याची रचना

समज की माझ्या पाठीला पोक जन्मतःच होतं.
" म्हणजे अमुक एका प्रकारे आयुष्य जगावं
--किंवा अमुक एक समजूत किंवा दृष्टिकोण
...म्हणजे हे तुम्हाला कधी आलं ? "
खरं म्हणजे ही मुलगी माझ्यावर प्रेम का करते
हे अजूनही मला कळलं नव्हतं किंवा तिच्या
साडीवर आज कमळंच का हेही...
मी तसा कधी विचार केला नाही,
मला सांगतां येणार नाही.
" तुम्ही मला आवडता कारण तुम्ही
वेगळे आहात...पोक महत्त्वाचं नाही..."
माझ्या पाठीचं ओझं, बघणारेच फार वाहतात.
आणि वेगळा म्हणजे कसा ?
सगळ्या धोक्यांतूनही सहीसलामत सुटून जाणारा ?
" नात्याची पक्की कल्पना आली की
नातं संपून जातं...तुम्ही संपत नाही..."
मी संपत नाहीं हे खरं नाही.
न संपणारं आणखीनच काही असेल.
" पण तरीही आपली भेट व्हायला नको होती.
...माझं संपूर्ण आयुष्य धोक्यात आलं आहे..."
तुझ्या साडीवर आज कमळं असण्याइतकं ?
" त्यात आणखी हा सूर्यास्त...".
□

# तर्कशास्त्र

अंधाराच्या अंगांगाचे अतिसूक्ष्म तर्कशास्त्रही
पोचत नाही प्रकाशापर्यंत
वेदनेतून सुटण्याचे सर्व मार्ग
वेदनामय.
□

# भान

जे सांगता येत नाही
ते सांगू नये ;
जे सांगता येते
ते सांगताना फक्त त्याचे भान असावे.

खुराड्याने वर्णावे खुराडेच
वर्णन आणि वर्णित्यात आकाशाचे अंतर असावे
एरवी आकाशाला तरी कसे असू शकेल
स्वतंत्र अस्तित्व ?
□

## नवी विटी

नवी विटी नवे राज्य
उघडा म्हणतो नागडा त्याज्य
दुःखाच्या परी पडतात सरी
पावसापेक्षा उघडीप बरी
आलटून पालटूनही जवळजवळ तेच
स्वतःच पेच अढळ शिरपेच
नव्या विटीवर नवेच नाव
निदान या तरी नवसाला पाव
□

## धुतलेले दगड

धुतलेले दगड
        टाकलेली भाषा
संतत वाजत
        संभोग ताशा
तापलेली कातडी
        प्रतिकारत अस्त्र
आभाळात लोह
        गाजत गात्र
□

## अन् उगवला मला

मीच होतो मलाच असह्य
किंबहुना असह्यताच खुद्द
प्रक्षोभ, हिंसा, सुख आणि विनाश
होतो मी असंख्य वेडे

आमचे असणेच आहे आमचे दुःख
अन् आमची प्रत्येक कृती आमचा नरक
हे कळताच झालो आम्ही प्रचंड अस्वस्थ
अन् भयग्रस्त

स्वतःच स्वतःचा नरक असे राहणेही शक्यच नव्हते

आम्ही निघालो
अन् उगवला मला असा एक क्षण
जो नव्हता माझी कोणतीच संख्या
□

## समिती

सर्व माणसांना पटेल अशी संघर्षहीन
जगाची चालचलणूक आखण्यासाठी
काही माणसांची एक समिती स्थापन झाली.
आकाशातील फरकांची सूक्ष्म नोंद घेऊन
सर्व राजकारण्यांसाठी एक विशिष्ट
लस शोधून काढावी असे ठरले.
त्याला राजकारण्यांनी
मानवतावादाच्या पायावर विरोध केला.
या विरोधाला अनेकांचा पाठिंबा
मिळवणे त्यांना जड गेले नाही.

तेव्हा सर्व कागदपत्रांचा त्याग
अत्यावश्यक असल्याचे समितीला कळून चुकले
आणि गुप्ततेचा स्वीकारही.

तेव्हापासून समितीच्या कार्याबद्दल
कुणालाही काहीच कळले नाही.
सदर समिती बरखास्त झाली असावी
असेच माणसे धरून चालू लागली.
आकाशातील फरकांचा सदर समितीशी
येऊन गेलेला संबंधच फक्त कुठेतरी
सुप्त मनात राहून गेला.
आणि राजकारणी मात्र अधिक सावध झाले
म्हणजे जवळजवळ किंवा बरोबरच सगळीच माणसे.
□

## सवंगडी

माझा हलकट सवंगडी मला त्याचा हलकट सवंगडी म्हणतो.
आमच्या दोघांच्याही जिभांतून येणारे रक्त आवश्यक म्हणून येते.
माझ्या हातात पिशव्या असल्या तर तो आत डोकावत नाही.
जिवंत राह्यला आवश्यक किरकोळ सुऱ्या, दोर असणार हे तो समजतो.
त्याच्या पावलांचा दगडी आवाज मीही मनावर घेत नाही असा राहतो.
आमची जुनी ओळख अधिकाधिक भेदक होताना आम्ही दचकत नाही.
तसे आम्ही उगीचच एकमेकांच्या वाटेला जात नाही आडरानात.
परंतु निश्चितपणे समजून असतो दुसरा किती निश्चित आहे ते.
माझा दोष असा की मी स्पर्श केला की तिथे जखम होते.
तो पाहील तिथे काटे उगवतात. मी स्पर्श करत नाही, तो पाहात नाही
शक्यतो.
□

## दुसरे आणि मी

सहजता गमावलेला बिंदू
झाला सर्वात महत्त्वपूर्ण
आणि मला ओलांडून गेलेले सूर्य
पुन्हा परतले.

ज्यांचा आधार मागितला ते सूर्यच
सामावले सर्व दुसऱ्यांत
अन् केवळ असण्याच्या भयानेच विखरून
मी अंधारात बसून राहिलो...
□

## मन

सूर्यफुलांची अमर्याद गर्दी आणि
मानवी रक्ताची उष्ण कारंजी
यांच्यांत राजकीय डावपेचांप्रमाणे
मी नाती निर्माण करतो आहे काय ?

सत्य हे आहे :
सर्व अनुभवांचे सार -- पराभव.
सर्व अनुभवांचे सार - संकोच.
सर्व आभाळांवर गुंग करणारे छिडकावे.
सर्व पक्ष्यांचे पंख -- शेवटचे निरोप.
सर्व वाहकांची गती -- सातत्य.
सर्व डोळे -- किनारे...

सर्व निर्मिती -- फक्त मनाच्या हालचाली
आणि मन -- फक्त काही गोठणप्रदेश --
पाकळ्यांवरील रक्तबिंदूंचे...
□

## सत्य

कुणी काय करावे
आणि कोण कसे केविलवाणे झाले
यांच्या बसल्या ठिकाणच्या
आत्मतुष्ट कथा बास झाल्या.
आडून आडून स्वतःचे श्रेष्ठत्व
सिध्द करण्यासाठी वापरलेला उपरोध
ही कर्मठ सोवळ्या म्हातारीची हुशारी असते.
अर्थ लावण्याचे अंतिम अधिकार
कुणाकडेच नसतात.
शेवटी प्रश्न तरी काय आहे ?

विध्यर्थात आयुष्य कसे गोठवायचे -- हा ?
की
मला आयुष्य गोठवायची गरज का वाटते
-- हा ?
माझा गोठणबिंदू हा
अंतिम सत्य धरून
मी हिंस्त्र घोषणा देऊन
काय होणार आहे ?
माझे स्वतःचे प्रश्न टाळण्याचे क्रौर्य
एकदा जमल्यावर, त्याच क्रौर्याची
मी सर्व ' मूर्खां ' कडून अपेक्षा करू काय ?
" तसे करणे मला भागच आहे.
माझ्या कुठल्याही कृतीने कुणीही
जखमी होत असेल
तर तो त्याचा दोष आहे. "
-- एवढेच सत्य आहे काय ?
□

## जाग

जाग येतायेता जागेपणाच्या काठावर
कुठंतरी माणसांची वर्दळ जाणवत होती.
समोर कागद आणि खिशाला पेन लावलेल्या माणसांचा कोलाहल --
सुध्दा किती बारीक आणि स्तब्ध वाटत होता.
काठावरच कुठंतरी काहीजण विहिरीतून पाणी काढत असावेत.
एकूणच चर्चेला पाण्यावर आपटणाऱ्या बादल्यांचं पार्श्वसंगीत होतं.
मी पाण्यातून वर वर येत असताना तरंगत,
लागली चाहूल जेव्हा मला या सूडास टपलेल्यांची,
तेव्हाच सूड उगवला गेला.
चर्चेत विभागलेल्या बचकबचक पाण्याप्रमाणे
मी छिन्नभिन्न झालो आणि वेदनेत आक्रसत
सर्व संबंधांची गणितं मांडू लागलो
प्रचंड अस्वस्थपणे...आणि अचानक
तोच कोलाहल प्रचंड ऐकू येऊ लागला.
जगात माणसं नसून जणू त्यांचे
आणि त्यांच्या कृत्यांचे फक्त आवाजच होते.
हे सर्व त्यांचे आवाज म्हणजे कुणाचे ? की माझेच ?
आवाजांच्या प्रचंड भीतीनं माझे डोळे थरथरले...
" आता तो जागा झाला आहे... भीतीचं
कारण नाही..." कुणीतरी कुणालातरी म्हणालं...
अवतीभवती सगळीकडे डोळेच डोळे होते...
□

## माझे डोळे

चुरगळलेले आणि मुळातच पराभूत
आणि एकाकी माझे डोळे आपोआपच
ऐकत जातात एक मलूल भावहीन संगीत
जे टाळण्याकडेच असतो सर्व समुदायांचा कल.

मी टाळला जातो जरी टाकू शकतो त्याची खंत
मी माझ्या एकाकी रस्त्यावर
अपराधीपणानेच जवळजवळ मी जातो पळून
सर्वांपासून जे बोचकपणे वाटतात मला दयाळू.

सर्वांचे कपडे ठाकठीक -- सर्वजण बोलू शकतात
एकमेकांशी -- मीच फक्त दीन आणि दुबळा
आणि माझ्या डोळ्यांहूनही लहान माझे आयुष्य
'या सर्व माणसांचे करायचे काय'  हा माझा प्रश्न,

-- आणि 'या माणसाचे करायचे काय ' हा त्यांचा.
आक्रमणाऐवजी पराभवाचे अस्त्र असलेला अहंकार
घेऊन मी उभा राहतो समुद्रासमोर, वाळूच्या कणासमोर
आणि माझे डोळे भरून येतात काठोकाठ अश्रूंशिवाय.
□

## माझा आवाज

मंजूळ आवाजाची एक अलगद स्त्री
आणि तिला पांढरे पंख -- असा बाहेर पडलो...
प्रथम माझा एक मद्यधुंद मित्र भेटला.
माझ्याकडे पाहण्याचा त्याने एक क्षणभर प्रयत्न केलेला
मी पाहिला.
माझ्या सर्व अवयवांच्या लयीत
त्याच्या मद्याचे विष भिनले आणि ओसरले...
तेव्हा एक विमानांचा तांडा
माझ्या पंखांच्या रोखाने येत असलेला मला दिसला.
-- तो कदाचित एक आव्हान म्हणूनही आला असेल
पण
माझा अजिबातच प्रतिकार न झाल्याने
तो आरपार निघून गेला...
माझा मद्यधुंद मित्र वर पाहून किंचाळला,
" अश्लील !...अश्लील ।। .."
म्हणजे खरंच माझा आवाज
कुणाला ऐकूच जात नाही की काय...
की मी कधी काही बोलतोच नव्हतो... ?
□

# लिफाफे

लिफाफे अगणित जमले.
शेकडो प्रकारांची गरगरती अक्षरे--
इतकी निश्चित आणि इतकी हिंसक.
आयुष्याचे इतके अर्थ आणि इतक्या मीमांसा
-- नुसते अवशिष्ट अस्तित्वांचे
निगरगट्ट आणि भीतीतून शूर प्रकार.
लिफाफे हवेत उडणारे,
दोन्ही हातांत न मावणारे, पडलेले,
अवतीभवती इतस्ततः.
हे शेकडो दिशांनी चाललेले प्रयत्न.
प्रयत्नांचे खळबळजनक लिफाफे
असंख्य अधिकारवाण्या धारण करणारे --
मारझोड न करता मनांवर
सावल्यांसारखे पसरणारे.
हे जणू शुभचिंतन लिफाफे
शुभाशुभाची किनार अत्यंत प्रक्षोभक --
स्फोटक करणारे.
सगळ्याच सीमारेषा स्पष्ट करून
मधले-- मधले मार्ग देणारे.
लिफाफे लिफाफे लिफाफे
बिनतोड तोडींचे
हमखास लिफाफे. जणू
अपरिहार्य अस्तित्व असलेले
लिफाफे.
□

## तहान

कानठळ्या बसवणाऱ्या निर्जल गावात आम्ही
येऊन पोचतो - न पोचतो तोच तिचा पाय
एका फुलावर पडला म्हणून ती रडू लागली..
...इथं फूल आहे तर मग या गावाला निर्जल का म्हणतात...
मला त्या फुलाचा फार राग आला, मग
तिच्या पायाचा, तिच्या डोळ्यांचा, तिच्या मनाचा आणि
तिच्या अश्रूंचाही ..." दुसरे बरेच प्रश्न आहेत...
तो अन्नाचा डबा नीट धर...हुंदके नको देत बसूस
प्रश्नच नसलेल्या एखाद्या फालतू गोष्टीसाठी..."
या माझ्या सरळ बोलण्यात तिला क्रौर्य जाणवलं
त्या फुलाची आणि तिची मला किंमतच नाही
असं म्हणून ती अधिकच रडू लागली...
आमच्या मनांच्या क्रिया कशा चालतात... हे
अंतर कायमच राहणार का ..." या फुलामुळं
तुला कसली आठवणबिठवण झाली का ? " मी विचारलं
तर घनघोर पक्ष्यांचा एक प्रचंड थवा थेट आमच्या
डोक्यांवरून कलकलाट करत गेला... ती काय
बोलली ते मी ऐकलंच नाही...मुख्यतः मला
पाण्याची चिंता होती...जवळ अन्न होतंच...
प्रजननासाठी कार्य काय कुठंही करता येतं...
ती दयाळू होती की मी क्रूर होतो हे न समजताच
संतापून नाचू लागलो मी त्या फुलावर...अन् मग
फूल दिसेनासं होऊनही नुसत्याच मातीवर...
आता जणू माझी दया येऊन ती रडायची थांबली...
" चला " -- डोळे पुसून म्हणाली, " मला तर
सगळीच गावं आधी कधीतरी पाहिल्यासारखी
वाटतात -- आणि एकसारखी ..." आणि हातांत
हात घेऊन म्हणाली, " तुम्ही संतापलात की तुमची
दया येते आणि शांत असलात की भीती वाटते..."
मी गप्प राहिलो...
कुठल्याच गोष्टींत मला अपेक्षित बदल होऊ शकणार नव्हते...
मग खूप वेळ आम्ही काही बोललोच नाही...
एका झाडाखाली बसलो...जेवण केलं...
पाण्याची गरज आता दोघांनाही जाणवत होती...
तरीही रात्री प्रजननासाठी कार्य केलं...
सकाळी उठल्या उठल्या तीच प्रथम म्हणाली --
" तहान लागली की शांततासुध्दा कित्ती
भयंकर ऐकू येते..."
मी उगीचच मातीत रेघोट्या ओढत राहिलो
आणि प्रचंड विध्वंस पाहिलेल्या एखाद्या
अनुभवी माणसाच्या निर्विकारपणानं म्हणालो,
" हेच आपलं भवितव्य आहे..."
तिनं क्षणभर माझ्याकडे पाहिलं.
□

## मी आणि प्रजा

माझ्याशी बोलताना -- वागताना सर्वांनी
बेदरकार राहावं असा हुकूम मी सोडला होता --
वाटलं होतं की आता तरी आपल्या आयुष्याला
जरा विनोदी वळण लागेल...
पण काहींनी हुकूम पाळला आणि
काहींनी पाळला नाही -- त्यानं पंचाईत झाली...
खरे बेदरकार कोण तेच कळेना...
तेव्हा खरोखरच जे बेदरकार राहिले असतील
त्यांनीच फक्त थांबावं असा पुढचा हुकूम दिला
...तर दोन्ही गटांतले थोडे थोडे थांबले --
तेव्हा पुन्हा डोक्याला हात लावला ! -- आणि मग
त्याच हातानं आभारप्रदर्शनार्थ मोहरा वाटू लागलो ...
...पण वाटतावाटता मधेच डोक्यात विचार आला --
" मी आभारप्रदर्शनार्थ मोहरा वाटणार
या अंदाजानं तर यांतले कांहीजण खोटेच थांबले नसतील ? "
तेव्हा मोहरावाटप तुरन्त थांबवून वाटलेल्या सर्व परत घेतल्या.
..." समजा मी आता काही वाटणारही नाही
आणि तुम्हाला लक्षातही ठेवणार नाही -- मग
तुम्ही काय कराल ? " -- मी म्हणालो..
तर सगळेच निघून गेले.
म्हणून यंदाच्या वाढदिवसाचा माझा हुकूम आहेः
" एकूण एक सर्वांनी मोहरा घेण्यासाठी
आलंच पाहिजे. जे येणार नाहीत
त्यांना मोहरा मिळणार नाहीत."
पण तरीही सालं दुसऱ्यांबद्दल
आपल्याला काही खरं कळू शकत नाही हेच खरं !
पण त्यामुळं प्रजाजनांनाही
माझा शेवटपर्यंत अंदाज लागू शकत नाही
-- एवढं एक त्यातल्या त्यात बरं आहे
म्हणायचं झालं !
आमच्या विनोदाची मर्यादा ही एवढीच !
तरीही शेवटी " सत्यच फक्त विजयी होते "
हे मात्र खरंच -- आमच्या मर्यादेतच का होईना --
आम्हाला गंभीर वाटतं !

□

# स्पर्श

तिच्या स्तनाला स्पर्शण्यासाठी मी हात पुढारला
तर पडद्यावर मोठ्ठी सावली पडली
अन् ए ऽऽ हे ऽऽ इत्यादी उद्‌गार आणि शिट्टया...
योगायोगानं नंतर ती नटीच भेटली
-- " तुमचं काम तर छान होतंच पण शिवाय
पडद्यावरच्या तुमच्या स्तनावर माझ्या या
या हाताची सावली पडली होती. " -- मी म्हणालो.
नटी खळखळून हसली. म्हणाली --
" तसं तर फोटो, चित्रं, पोस्टर्स आणि
या अशा सावल्या वगैरे खूपच घडत असेल
...एकाच स्त्रीचा -- तिला उपद्रव न होता --
किती हा उपयोग ! " -- असं म्हणून पुन्हा हसली.
" पण माझा अभिनयही चांगला असतो
असं बरेचजण म्हणतात." -- असं म्हणून पुन्हा हसली.
" पण तुम्ही सारख्या हसता का ? " मी विचारलं.
" माझ्या आता फक्त हसण्यातच हसणं आहे...
स्पर्शातलं हसणं हरवलं आहे ...
आणि इतरही..." असं म्हणून
ती अगदी सिनेमातलं रडू लागली...
पण तिचे स्तन आकर्षकच वाटत होते...
मग मी एकूणच संस्कृतीच्या विरुध्द वर्तन केलं --
स्वच्छ विचारलं, " माझ्या स्पर्शाची ट्रायल घेता ? "
थोडा वेळ ती नुसती पाहातच राहिली...रिकामपणे...
" तुमचा स्पर्श जर मला जाणवला नाही
तर तुम्ही फार निराश व्हाल...
म्हणाल, पडद्यावरची मी आणि प्रत्यक्षातली
यांत काहीच फरक नाही...आणि
तुमची मग फक्त सावलीच उरेल..."
खरंच, मानवजातीची किती ही कणव !
मन दयार्द्र झालं. फार वाईट वाटलं.
" चला, मी तुम्हाला तुमच्या घरापर्यंत पोचवतो."
मी म्हणालो. ते मात्र तिनं ऐकलं.
उशीर झाला होता. पोरं वाट पाहून झोपली असतील.
वाटेत भाजी घेतली. महागाई तरी इतकी कशी होते ?
झोपण्यासाठी म्हणून पडलो तर नुसत्या शिट्टया आठवत होत्या...
हिचा हात माझ्या अंगावर आणि हळूहळू
थेट खिडकीतून आत टिपूर चांदणं...

□

# खेळ

शब्दांच्याच दुनियेत शब्द निरंकुश करायचे
-- मी खेळ मांडला.

प्याद्यांच्या पटावर प्यादी निरंकुश
म्हणजे राजे वगैरे बाहेरच -- मित्र म्हणाले.

राजांचं वगैरे इंदिरा गांधींना विचारा
पण शब्दांचं मलाच विचारा -- मी म्हणालो.

हां हां ! निरंकुश म्हणजे अस्तित्वहीनच
-- शब्द आणि प्यादी ! वा रे वा !

-- ते म्हणाले. म्हणजे आपण ठरवलेल्या
अर्थाहून शब्द अमर्याद होतील -- म्हणजेच

नाहीसेच होतील -- मी म्हणालो.
त्यात काय आहे ? शब्दच कशाला हवे ?

काहीही घ्या -- ते राहणारच नाही.
-- ते म्हणाले. मग मी म्हणालो -

मग शब्दच घ्यायला काय हरकत आहे ?
काहीच नाही तर शब्द का नकोत ?

हा काही खेळ होऊ शकणार नाही,
खेळात शब्द हवेतच -- ते म्हणाले.

तुम्ही मालक का रे शब्दांचे ? प्याद्यांनो,
शब्दांच्या राज्यात कविता नसतात -- मी म्हणालो.

ते ' कवी ' होते. मी कोण होतो ?
'शब्द '? 'अनुभव '? 'पक्षी '? ' दगड '? 'आकाश '?

□

## खुनाचा कट

कोनाड्यात व्यवस्थित ठेवलेल्या घड्याळाजवळ बसून
मी अगणित दिवसांची असंख्य वर्तमानपत्रं वाचली...
ढुंगणाला सूज आली म्हणून उठलो
अन् सहज म्हणून पाहतो तर घड्याळ बरोब्बर माझ्या दुप्पट उंच !
आणि एकदम गजरच सुरू झाला --
तर मी फर्रर्रर्रर्रकन् उडत उडत गेलो...
अंगाच्या सर्व कणांची वेदना झाली...
व्यथित अंतःकरणाने त्यातही आजूबाजूला पाहिले
तर तोवर गजर थांबला होता.
काळोख पडला होता, सामसूम झाली होती,
आणि माझ्या देखत हलक्या आवाजांत
एक खुनाचा कट शिजत होता...
" आणखी एका बातमीसाठी किती हा
मानवी आयुष्याचा खोळंबा ! " -- असे उद्गार
माझ्या तोंडून बाहेर पडले -- तर हलक्या आवाजात --
" माणसं आहेत तोवर कुणी ना कुणी
प्रसिध्द आणि लोकप्रिय होऊ शकेलच --
ती काळजी आपल्याला नको. " -- हे उद्गार !
तेवढ्यात एका झुरळानं मला डोळा मारला
त्याचा मात्र मला फार राग आला.
म्हणजे मी काय इतका नगण्य आहे की काय ?
□

## पाखरे

पाखरे उडूनही गेली असती
पण तू, विमनस्क का व्हावेस अन् आधीच परतावेस ?
हुशारीने जगणे म्हणजे फक्त भीतीत राहणे ?

तुझे स्फोटक संताप सहन केले जावे
तुझ्या हिंसक कृत्यांची कुठेही नोंद राहू नये
आणि सर्वांनी तुला देवमाणूस म्हणावे -
इतका तुला सावल्यांचा लळा का ?

निर्मितीची सर्व क्षेत्रे ओलांडून
आसरा घेतात जेव्हा पाखरे
एका विशिष्ट झाडावर
तेव्हा तू मत्सराने जळतोस.
त्यांच्या अंगाई गीतांतही
तुझे नामोनिशाण नसते.
याने तुझे बालपण आणि तारुण्य
कोरड पडल्याप्रमाणे वठून आलेले तुला जाणवते.

कामाने थकून आल्यानंतर पसरतोस तू पाय.

तुझ्या यशांचेही दारिद्र्य दिसते तुला छताकडे.
आणि सर्व पाखरे बंदिस्त करण्याचे
कोणतेच डावपेच आपल्याला सुचत नाहीत
म्हणून तू हतबल जळफळत राहतोस ...
□

## म्हणून

पुनरुस्थान व्हावे म्हणून
संघर्ष उभा केला, थवे जमले,
उडालेल्या पॉलिशमधून विचारांचे
प्रचार पसरले...
तरी फक्त काहीच घडले नाही म्हणून
कार्स थांबल्या, घाटात काहीतरी
कोसळले म्हणून वाकून पाहिले तर
डोळ्यांसमोर
हळूहळू सरणारे दृश्य आले
तेव्हा कळले की सगळे
एकाच मातीचे मणी
आणि स्त्रियांचे गाणे ऐकू आले
म्हणून रिलीफ वाटला
आणि लगेच लक्षात आले --
रिलीफ नाहीच --
कारण -- म्हणून.
□

## डाळिंबाऐवजी

उधारीवर आणलेले डाळिंब
तितकेसे समाधानकारक नसले तरी
लालसर गारव्याने हवा तापली.
आखडलेले स्नायू मोकळे झाल्याने
चालता येऊ लागले.
उधारीवर चालणारा माणूस
-- हे माझे नाव तेव्हा पडले.
ते मी मनावर घेतले नाही.
निर्लज्जपणा माझ्या रोमरोमांत होता.
हवा वारंवार तापत राहिली
तसतसे मी अनैतिक
असल्याचे ढग जमू लागले
माझ्याच मनात
आता मला उघडे पडून चालणार नव्हते.
थंडी सोसली नसती.
शेकोटीच्या बहाण्याने
हवा तापवू लागलो मी
डाळिंबाऐवजी,

हे मात्र खटकणारे नव्हते.
मग जुनी उधारी फेडून टाकली.
फेडलेले वस्त्र पुन्हा चढवले.
हे नीतीमत्तेत बसणारे होते.
पुन्हा कधीच उधारी झाली नाही.
अनुभवातून माणूस शिकतो
हे मला समजले.
डाळिंबाऐवजी.
□

## धर्म

शेवटी माझ्यावर आले.
प्रत्येक धर्माची वैशिष्ट्ये होती
त्याला मी काय करणार ?
हाच प्रॉब्लेम असल्याचे चाचरत सांगितले.
पण तो सोडवायचा होता.
प्रॉब्लेमच नाही असे खरे तर हवे.
मग सोडवणार कसा ?
सोडवताना सगळे टिकत होते.
' नव्या रचनेत विसावेल सगळे '
मला खरे वाटत नव्हते.
धर्म हा नाकारता, स्वीकारता किंवा बदलता कसा येईल ?
पण मी ' हो ' म्हणालो.
आणि लगेच किंबहुना त्याच वेळी
नव्या रचनेला नकार दिला.
संकट शेवटी होते म्हणण्यापेक्षा
आधीच होते.
माझ्यामुळे काहीच घडले नाही.
मी कसा काय जबाबदार ?
माझा धर्मच...
म्हणजे टाळता येणार नाही.
शरीराला आकार असणारच.
' संघर्ष टाळण्यासाठी सुधारणा हवी.
अन्याय टाळण्यासाठी सुधारणा हवी. '
माझ्या सुरक्षिततेची कास न सोडता
व्यवहार्य मार्ग म्हणून जागेपणी
स्वप्नात सामील व्हायचा निर्णय घेतला.
निदान मला समजलेले
उघड तरी होणार नाही.
फरक फक्त इतकाच राहिला --
मी जे म्हणत होतो
त्याच्यावर माझाच विश्वास नव्हता.
यालाच काहीजण परिपक्वता समजले...
-- हे एकवेळ चालू शकेल.
□

## वर्तन

मस्तकशूळ सूळ होतोय
की काय अशा सांज केळी
वांझ मनाला समजावण्याची मेळ
नसलेली वेळ खाली तेव्हा
कुणाचाच धागा तुटला काही
बाही नाही म्हणून उत्तान दिसण्याने
कप्तान झाले स्वार तरीही
उर्मटपणाचा लवलेश नसलेले लव्ह
नव्हाळ्याचे लोणी होत अधीन झाले...
महिन्याकाठी काठावर टेकलेले तास
वास म्हणून वारता नेईना कमरेवर
खरे तर कमरेआली कुणाला वाली
राहिला न पाहिला असे भाले
खुपसले...
विकसले सौभाग्याचे प्रगतिकमळ...
ही तिसरी वेळ होती...
पहिला जमाखर्च
आणि फक्त दुसराच अनुभव होता...
घरंगळले ते सगळे
वाया गेले असे वाटले
न वाटले तोच पुन्हा
मस्तकशूळ सूळ...
आवर्तनाऐवजी नर्तन हेच वर्तन व्याले.....
□

## चिमणीचा आवाज

हा चिमणीचा आवाज
मला ऐकू येण्यासाठी
आहे का ?
की माझ्या व्यतिरिक्तही
तो आहे ?
माझा मेंदू आणि माझे
अनुभवक्षेत्र
माझ्या शरीराशी निगडित,
माझ्या शरीराबाहेरचा
हा आवाज
मला याच शरीराने, शरीराबाहेर
ऐकता येईल ?
मी तर
शरीराबाहेर कुठेच नाही.
माहीत कुठे असतात मेंदूला
शरीरबाह्य संबंध ?

मला काहीच कळत नाही.
कारण
माझ्या व्यतिरिक्त
मला काहीच माहीत नाही.
फक्त मीच जर आहे तर
हे बाहेरचे सगळे काय आहे ?
की ते नाहीच ?
माझे मलाच पडलेले प्रश्न
मीच मलाच विचारतोय...
चिमणीचा आवाज
आतल्या आत दडपत...
□

## कोरी कविता

शब्दांनो फेका ओझी
अन् व्हा सुटसुटीत

अर्थहीनतेला सामोरे होताना
सर्व संदर्भांना जातात छेद

संदर्भहीन शब्दांनो
या माझ्या प्राणांनो

आता तुम्ही केवळ शब्द नाही
मी आहात

केवळ मी नाही
मी आहात

१.
तू माझी प्रेयसी आहेस
अशी कल्पना करून

करतो मी तुझे स्तवन
गगन
गगन गगन गगन गगन

स्तवन...मी
टाकून सर्व
स्तर

२.
. मी प्रखर

माझे स्वार्थ, इच्छा
होत्या म्हणजे आहेत
आहेत पण आता सर्वस्वी काळोख

निर्यमक उलगडताना
तुझ्या सर्व गुपितांचे
स्फोट होत गेले माझ्यात

हे अर्थहीनते
तू माझ्या सर्व अनर्थांची भक्षक आहेस
माझ्या म्हणजे सर्वांच्या

माझा तर्क ओस
पडतोय की काय ?
माझे शब्द
चित्रहीन
अन् अभिव्यक्ती नग्न

३.
तो हसतो
पण थोडी उणी चव ;
बोलतो पण खूप आतून
अन् चुरगळून.
चेहरा नितळ
तळच्या हालचालीही वरून स्पष्ट
लोक म्हणतात हा फार उघड
अन् फार लाजाळू
अन् फार हयात
तो म्हणजे मीच
मी सर्व नामं
मी सर्व सर्वनामं
मी सर्व
सर्वांहून सर्वयुक्त तू
माझी प्रिया

४.
. तुझामाझा संबंध जगजाहीर
अन् तू कोण
हे माहीत नसतानाही
मी बदनाम.
समाजबाह्य.
हे प्रिय अर्थहीनते,
तुलामला सर्व टाकू इच्छितात
वाळीत
अन् धजतात

हे प्रिये
मी तुला शोधले
की स्वतःला हरवले ?
मी सर्व संबंध
समावेशले
की स्वतःला हरवले ?
सर्वार्थांनी मी मला
सापडलो की हरवलो ?
हे तर्कमर्दिनी
मला आता उत्तरे अपेक्षित नाहीत

५.
तुझ्याशिवाय
सर्वांचे जन्म
अन् सर्वांशिवाय
तू आहेस
न माता न पुत्री
अन् सातत्यहीन

६.
माझ्या असण्याचा पाया कोणता ?
मी कुणाच्या पाया पडावे अन् का ?
प्रत्येक प्रश्न
म्हणजे माझ्या स्वयंभू अस्तित्वाचे
निगरगट्ट मूर्त आविष्कार
माझी मलाच कठोर हमी देणारे
उत्तेजक

हे प्रिय निर्हेतुके
तुझ्या स्पर्शात
मी झालो प्रश्नहीन
अन पटता न पटता
अन् आश्चर्याशिवाय
मूर्तिहीन

कुणीच कुणाला ठार करू शकत नाही

७.
तरीही मी तोच आहे ?
अगदी तोच ?
माझे विरळ काठ
मधेच असे स्पष्ट कसे होतात ?
अजूनही
एका विशिष्ट देशाचा
एक विशिष्ट नागरिक

एका विशिष्ट प्रकारे
स्वतःच्या आयुष्याची
आखणी करणार आहे ?
मर्द ?

८.
अर्थांचे सर्व डोंगर
संशयास्पद
त्यांच्यातच केवळ त्यांचे पुरावे
पण हे प्रिये
तुझ्यात तुझी सत्यता ताडण्यास
मी उरतच नाही

९.
विचार सुजत येतील
पायांकडून अन डोक्याकडून
माणसे पुसट होतील
पाण्यापलीकडे, जिवंत अन् दयाळू
दोरखंड तुटतील
केवळ घर्षणातून थकलेले
अंधाराला फुटतील दात
रक्तहीन शरीरासाठी
अन् पुढच्या सर्व कल्पना
प्रत्यक्षात येतील
वा न येतील

एक भयंकर झंझावाती हिसका
अनुभवून
अनुभवून
अनुभवून अनुभवून...

१०.
हे प्रिये
अमर्त्यता
हाच आपला सर्वस्व-संभोग

११.
माझ्या शरीराला पालवी फुटली आहे
आकाश, झाडे, डोंगर, कारखाने
अन् तेलांचे वास
सर्व रोमांचयुक्त
माझ्या बीजांकुरांनी...
सुप्रसिध्द मानववंशाचा
मी एक अंश

अंशहीन झालो आहे तुझ्यात अनंग
सर्वस्व ओसंडून

१२.
हे माझ्या अर्थहीन प्रिये
करत राहा माझ्यातले सदोदित
सर्व अर्थ नष्ट
अन्
माझ्या म्हणजे सर्वांच्या
सर्व अर्थांच्या सर्व मर्यादा
संपोत

तुझ्या निर्योन संपूर्णतेत
□

## प्रेमगीत

आजूबाजूला धूर पसरणाऱ्या वेळी
दाटत जाणाऱ्या पोरानं
झोपडीच्या टोकाशी सदऱ्यानं पुसलेला
हुंदका का आठवावा तुला या वेळी
फरसबंद शुभ्र आभाळाखाली
सोनेरी उन्हात गुलाबी दृष्टीबरोबर
असताना समोर लहरत्या वृक्ष - वल्लरी

दूर एक खूप रम्य नगरी वसून आहे
असेल...असावी...
अंतरंगात आपल्या प्रेमाची सुरुवात
सुरुवात...शेवट...असावा... असावी

का यावं स्वप्नात तुझ्या ते हिंस्त्र पाखरू
का ठेवावं तडफडत त्यानं आपलं भक्ष्य
का उडू नयेत तुझ्या सागरावरून शुभ्र सुंदर थवे
का तरळावा डोळ्यांत तुझ्या दोन अक्षरी संहारक
होऊन जाव्या असंख्य उखाण्यांच्या निरुत्तर कहाण्या

किती काळ झाला
आपण भेटलो तेव्हा सहाचे टोले पडत होते सांज
रस्त्यावरून स्वच्छ मनाचा माणूस गेल्यासारखा
ओसरून लख्ख झाला होता पाऊस
दूर थोड्या प्रकाश-ओसरत्या घरात वेळानं लागला
एक दिवा ...तू म्हणालीस ते माझं घर
आडोशाहून मग तू निघून गेलीस ओशाळल्यासारखी...
उभा राहिलो मी मात्र तिथेच दाटत दाटत
खिडकीतून माझ्याकडे पाहातच झोपी जात असलेली

दिसलीस तू दुरूनही...वळलो...दिवा मिटल्यावर
किती काळ झाला
उकिरड्यावर मूठ वळल्या अर्भकानं किंचाळून
खिडकीतून माझ्या स्वप्नातलं ते मांसल मूल
दिवा फुटून छिन्नविच्छिन्न होणारा काळोख
किती काळ झाला

ए आपण जाऊ या इथून
आपण भेटलो हे ठिकाण चांगलं नाही
संध्येसारखा गुदमरतो इथं
प्रकाश आणि काळोखही

आपण दोघं ही आपण दोघंच असणार
आपण दोघं ही आपण दोघं असेपर्यंत
असाच असणार हा मधला काळ
तो फुटका दिवा फुटेपर्यंत
कोसळणारा लोळ दोघांनाही दिसेल
ते ठिकाण मग हे असणार नाही
हे असलं तरी
फक्त लोळ असूं... फक्त अफक्त...
एका क्षणी संपूर्ण शरीराची असंख्य पाखरं होऊन
सर्व रस्ते उल्लंघताना पाहिली आहेत मी माझी...
किती काळ झाला...आठवत नाही
माझीच रूपं माझ्याच रूपांचे उकिरडे करीत आहेत हे
माझ्या ह्या माझ्याच रूपाला दिसून
धुरात कोसळलेला अश्रू ऐकू आल्यालाही पुसता पुसता प्रकाश
आठवत असून...हे...हे ते नव्हे...

आठवतं तुला
ते माझं तू काढलेलं
निळ्या समुद्रफुलांचं मोरपंखी चित्र

त्या चित्रावरचा एक अदृश्य तांबडा ओरखडा
जागवू नकोस तुझ्या मखमली स्पर्शानं
झाकळून टाकेल नाहीतर तो पसरता पसरता तुझा समुद्र

माझं अंग कसं --
    काळाच्या ठोक्यांसारखं झालंय
    चेतक
लोटणार नाहीस ना
हा पूर
    माझ्या मनावरही आदळणारा
    स्तनगुच्छी वारा
    रक्तोष्ण परसतो आहे शरीरभर

आपण एक आहोत
नाही...
सकाळ झाली
    अं... नाही अजून...खूप वेळ आहे
    त्यापूर्वीच किनारा सोडणार आहे मी
    मी म्हणजे तू नसलेला मी
दूर झालायस तू
तुझ्याशिवाय
कोसळून पडल्यासारखं वाटतंय
हे अंग
    जातोय मी
    पाखरं पुन्हा उडू शकली आहेत
    उडायची आहेत कित्येक रूपं अजून
    तू एक आहेस ... मी एक नाही
    हा मी तुझाच असेन...पण
    पाखरांना उडूं द्यायलाच हवं
    मीही नव्हे...तूही नव्हे...आपणहून...
    दिवा लावून जातो आहे मी बाहेर
वर्षांनी मोजत येणार नाही हे अंतर
मी पडून आहे अशी या प्रकाशात
निघून गेला आहेस तू
माझ्यात तुझी एक वेदनेसारखी प्रकाशी खूण ठेवून...
उगवत्या पहाटेच्या गतीनं रात्र सरते आहे
काय म्हणून विचारावेत तुला मी प्रश्न
पसरत असताना तुझ्यातून माझा प्रवाह
माझ्यातून तुझं अस्तित्व
कोसळता लोळ पाहिला आहेस तू...उडती पाखरं
मी नाही...पण
काय म्हणून झिडकारावं तुझं नवास्तित्व
मी...शुभ्र आभाळ

आलो आहे मी
प्रश्न हवे आहेत मला जरी
मी काहीही देणार नाही...नसलो तरी
मी...
एक तू असलेला
एक तू नसलेला
मी माझं रूप
आणि
माझ्या संपूर्ण शरीराची होऊन उडून जाणारी पाखरं
रस्त्यांवरून

आठवतं आहे
अनुभव...बीज...आणि प्रश्न
मी विचारू इच्छित नाही

तरीही
ते का

तू प्रश्न विचारला आहेस
विचारला नसलास
तरी...

हेच माझं घर...
हाच माझा दिवा
हीच माझी खिडकी
हेच माझं स्वप्न

फक्त मी तुझा नाही
मी तुझा असलो तरी
आपण
तुझे नाही आहोत...आपण
माझे नाही आहोत
का अशा
होऊन जाव्या
असंख्य प्रश्नांच्या माझ्या निरुत्तर कहाण्या
आठवावा
कहाणीच्या चित्रावरचा अदृश्य काळ

तुझ्या रूपांकडे जायला हवंय मला...माझ्या
...तू
पाऊस पडतो आहे

पाऊस पडतो आहे
पाऊस पडतो आहे
पाऊस पडतो आहे
पाऊस...
आठवतो आहे तो क्षण...
..ओसरून लख्ख झाला आहे पाऊस
रस्त्यावरून
स्वच्छ मनाचा माणूस गेल्यासारखा...
...आणि आपण भेटतो आहोत
एका संध्याकाळी...
□

## भाषा

झाड म्हणजे रूरकेला
आणि पवनचक्की म्हणजे
सुईच्या टोकावरील जंतूंच्या सर्व पिढ्या
किंवा आपल्याला माहीत नसलेला
कोणताही अर्थ.
माहीत होताच बदलणारा.

शब्द म्हणजे अणू.
रचनेचे पाताळयंत्र.
प्रस्फोटताच
असंख्य नद्यांच्या पात्रांतून वाहती प्रेते
येऊन पडतील सुकलेल्या
डांबरी रस्त्याकडेला
अन् सूर्याचे स्थान बदलताच
वा न बदलताच अवाढव्य उलटासुलटीत
समुद्राकाठच्या वाळूतले चपळ कोडगे खेकडे
विसरतील आपले अबाधित सल्लागार-मंडळ.

विरळ चकचकीत पत्रे
गेले अत्र्यांकडे न्याहरीला
तर हनुमानस्तोत्र म्हणता म्हणता
सर्व कम्युनिस्ट अस्तित्ववादी झाले.
चर्चेला पातीचा कांदा होता,
दोन तोंडांचे कासव होते,
अन् एक महाबिलंदर मिशांचा राजपुत्र.

माझे नाव तेहरान आहे.

गल्लीबोळांतून भटकणाऱ्या म्हाताऱ्यांना
मी म्हणालो की मला माझा शिंपी दाखवा
तर सुरुवातीला ते जणू काय हसणारच होते
पण त्याऐवजी त्यांनी फक्त उजवे पाय
आपटले आणि संस्कृतचे महत्त्व विशद केले.
तेव्हा कुठे मला झोप लागली.

त्यानंतरच्या श्रावणीला
युनोतली सर्व राष्ट्रे गैरहजर होती.
म्हणून भारतही गैरहजर होता.
पण तरीही तो साठ कोटींचा देश नाही
असे कुणीच म्हणू धजले नाही.
उलट सर्वांनी सर्वांची प्रशंसा केली.

पंडित नेहरूंनी बेकारीच्या काळात

किती हालअपेष्टा सोसल्या होत्या
ते महात्मा गांधींना कुठल्याच दिवशी कळले नाही.
म्हणूनच जगाला
आधुनिक मंडईचे शिल्पकार मिळाले.
आणि शिल्पाला तिचे यजमान.

यातच जगातल्या सर्व घटनांचे बीज आहे.
खरे, खोटे, संशयास्पद,
किंवा काहीच नसलेले.
पण कदाचित चमकू शकणारे.
थोडे पाणी, थोडे अर्घ्य, थोडा सूर्य
अन् थोडा लिटमस. मेला डोळा मारतोय.
पूर्वपरंपरेने चालत आलेली मादक मैत्रीण
झटकन भलत्याच घरात शिरताना पाहिली
अन् मी शांत झालो.
कारण घर माझेच होते अन् तिथे मीच जाणार होतो.
तिला वाटले असेल की
मी म्हणजे कुणी दुसराच आहे.
मजा.

अन् काल तर मला आरशात मोतीलाल दिसला.
त्याची किलवर सत्ती हरवली होती.
ही गोष्ट मी सरांना सांगितली
तर ते म्हणाले की कुठलेही उत्तर देताना
या भागावर भर द्या.
हा भाग विशेष महत्त्वाचा आहे.
आणि हे म्हणत असतानाच
त्यांना भलत्याच ठिकाणी खाजत असावे
ही काय नियती म्हणावी !
विद्यार्थी कुमार्गाला लागतात ते असे.
( शेवटच्या वाक्याला एकच अर्थ आहे. )

उरलेसुरले त्राण एकवटून या आभाळाखाली
मी तुम्हाला हे एक शेवटचे सांगतो.
निदान यावर तरी अविश्वास दर्शवा.
कुठलीही गोष्ट वा वस्तू तुम्ही जेव्हा
संपूर्णपणे टाकता तेव्हाच ती तुम्हाला कळते.
भाषेचे तसेच आहे.
सारांश म्हणजे संपूर्ण कविता पुन्हा वाचा.
□

# युध्दाच्या कविता

१.

स्वतःलाच मी संशयास्पद,
माझी कशी कुणाला जवळीक वाटणार ?
माझा बिनखात्रीशीरपणा
सतत गोंधळ निर्माण करणारा ठरला ;
मला नष्ट केल्याशिवाय
मित्रमंडळींची आपसातली मैत्री टिकणे कठीण झाले.

मला नष्ट करायला कुठून सुरुवात करावी
यावर त्यांच्यांत वादावादी झाली.
कारण
माझी सुरुवात सापडणे शक्यच नव्हते
( आणि म्हणूनच शेवटही. )
ते माझे होते, पण
मी त्यांचा नव्हतो.

मी त्यांना निश्चित दिसलो असतो
तर लगेच त्यांनी उखडले असते मला,
पण
मग बहुतेक उखडायची गरजच भासली नसती त्यांना ;
उलट सशक्त करत बसले असते ते मला.

२.

गोंधळाची संगती लावता आली नाही,
स्वस्थ राहिलो, आणि
वाट पाहात राहिलो --
येणाऱ्या आरोपांची, न्यायनिवाड्याची
आणि अर्थातच
शिक्षेची.

गोंधळाचा भाग राहिलो असतो
तर गोंधळाने माझ्याशी शत्रुत्व मानले नसते.
परंतु आता
माझ्या ' मूढ ' शांततेवरच
सारा पसारा कोसळणे
अपरिहार्य होते.

३.

माझे महत्त्व
माझ्या व्यतिरिक्त आहे;
माझा हेवा करू नका.

४.

आम्ही कविता लिहायला गेलो --
आम्हाला न पचलेल्या अनुभवांच्या शाब्दिक
ओकाऱ्या झाल्या ;
तरीही होणारी रंगांची तारीफ ऐकून

आम्ही खूष झालो.
खाण्या -- ओकण्याचा सपाटा लावला...

मनात आमच्या अपराधी भाव होते
आम्ही अत्याचारांचे स्वातंत्र्य तर उपभोगीत नव्हतो ?

कवितेला कविता म्हणता यावे म्हणून
आम्ही उत्कटतेचे पोवाडे गायिले ;
गोंगाटात अर्थातच शांततेचा पहिला बळी गेला.

आमच्या हल्ल्यांचे वर्षाव वाढतच चालले ;
वाचकांची आयुष्ये थोडी थोडी बदलली.

चांगले परिणाम आणि वाईट परिणाम
यांच्या आम्ही चाळण्या काढल्या.

कोणताही परिणाम करणे
हा उद्देशच टाकलेल्या कवितेची आम्ही हत्या केली
कारण ती कविताच नव्हती...

**५.**

उपरेपणाने का असेना
मी समोर आहे हे तुमचे नशीब समजा.
हा खोटा विरोधही मी काढून घेतला
तर तुम्ही दिशाहीन फेकले जाल.

**६.**

तुमच्या विध्वंसकतेला
माझ्याइतके नाजुक कुरण नाही ;
चरा.

गवत खाल्लेत
तरी जमीन अबाधित राहील...

कोणत्याही व्यक्तिमत्वाची
टिंगल टवाळी करून चिंध्या करणे
कधीच अशक्य नसते.

परंतु आपण कशाच्या चिंध्या केल्या
आणि
काय शिल्लक राहिले
ते पाहा.

**७.**

आपल्याला दिसणारे तेवढेच
एकसंध आभाळ सांभाळण्याची
मला काळजी नाही.
मी तडजोडीला तयार झालो म्हणजे

माझे आभाळ फाटले
असे समजण्याचे कारण नाही.

उलट तडजोडीला तुम्हीच तयार होताहात ;
तुम्ही खूप आहात,
मी एकटा आहे.
माझ्या एकटेपणाच्या निरर्थकतेची शक्ती
आज
तुम्हाला गोंधळात टाकते आहे ;
कारण
माझ्यावर हल्ले करून काही उपयोगच नाही.

या ओळींना कविता म्हणू नका,
ललित लेख म्हणा,
-- याला मी हरकत घेऊन काय होणार ?
परंतु तुम्हाला आता मात्र
अधिक मूलभूत हल्ले करावे लागतील.
**८.**
माझ्या भोवती इतके कडेकोट आग्रही हेकट
हल्लेखोर वातावरण
असण्याचे कारण काय ?
कारण एकच --

ते तसे आहे
असे मला फक्त वाटते आहे
-- हे कधीकधी माझ्या लक्षात येते.
**९.**
आपले युध्द म्हणजे  काय
तुमचे माझ्याशी युध्द.
-- ते तसे अटळच होते.
निकालही ठरलेला होता --
तुम्ही खूप -- मी एकटा
-- आणि पंच तुमचे.
गल्लीबोळांच्या विशिष्ट व्यूहाबाहेर
पडणेच तुम्ही अशक्य केलेत.

घरा -- झोपड्यांतील सर्व माणसांनी
बाहेर येऊन दरवाजे बंद केले.
ते उत्सुक प्रेक्षक झाले.
उत्सुकता निकालाबद्दल नव्हती,
त्याआधीच्या हुकुमी हिंस्रतेबद्दल होती.

व्यूहाबाहेर पडायचा मी प्रयत्नच केला नाही.
त्यामुळे व्यूह अस्तित्वातच राहिला नाही.
आता मला असल्या जागीच येऊन

ठेचण्याशिवाय तुमच्यापुढे मार्ग नव्हता.
हा तुम्हाला अनपेक्षित पराभव वाटला.

पंचांनी युध्द बेमुदत तहकूब केले.
**१०.**
युध्दाचे वगैरे तुम्ही विसरणे बरे
त्याबद्दल लौकरच तुमचा भ्रमनिरास होईल.
दुर्लक्षून नष्ट करणे
हा एकच मार्ग तुमच्यासमोर आहे.
याही मार्गाची तुम्हाला खात्री दिसत नाही.
तुमचा पेच मी कसा सोडवणार ?
**११.**
तुम्ही टर उडवत राहिलात
आणि मी अस्वस्थ झालो.
तेव्हा खरे तर मी तुम्हाला सापडलोच असतो.
पण नशीबच असे महान
की त्या क्षणाकडे तुमचे दुर्लक्ष झाले.
टरीच्या सातत्यात
तो क्षण निसटून गेला.
**१२.**
आता तसा खूप उशीर झाला आहे ;
दुर्लक्ष करण्याचा तुमचा डाव
माझी बरीच शक्ती प्रगट होऊ देण्यास
कारणीभूत झाला आहे.
पहिल्याच ओळीवर तुम्ही मला ठेचायला हवे होते
पण तुम्हाला माझा अंदाज
जरा उशिराच आला काय ?
**१३.**
आज तुम्ही माझे ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही आहात.
सगळी भाषाच एक प्रतीक असते.
वस्तूंची आणि दृश्यांची मोजदाद व्यर्थ आहे.
फक्त शब्द मोजा.

दृश्यांच्या आणि घटनांच्या गुणधर्मांवर
फारसे न बोलणे हा माझा स्वाभाविक धर्म आहे.
समर्थनांपेक्षा धार्मिक गुन्हे मला अधिक पसंत आहेत.
या गुन्ह्यांमधल्या वेडाच्या शक्यता
मला या धोकेबाज आयुष्याच्या जवळ ठेवतात.
कधी काय घडेल याचा अंदाज लागूच नये.
आपल्याला माहीत असलेली कुठली गोष्ट
जिवंत असते ?

माझे शब्द, विचार या माझ्या कविता नाहीत.
माझ्या कविता म्हणजे
मधल्या सर्व पोकळ्या.

या सर्वस्व हरवलेल्या रिकाम्या कविता आहेत...
ही आव्हाने किरकोळ समजून
आपणा सर्वांना चालता येईल
तितके बरेच आहे..
माझे गुन्हेही किरकोळ वाटले तर फारच उत्तम.
तसा मी जवळजवळ निरपराधच आहे...

**१४.**

तुम्ही युध्दशास्त्रपारंगत
शूर, व्यासंगी योध्दे.
पण
युध्दच न मानणाऱ्या मला
तुम्ही कसे हरवणार ?
भ्याड म्हणून हेटाळून ?
की हसून सोडून देऊन ?
शास्त्रात काही उत्तर सापडते का पाहा.

**१५.**

तुम्हाला जाणवणारे आणि मला जाणवणारे
यांपैकी कोणते तरी एकच सत्य आहे काय ?
की दोन्हीही असत्य असण्याच्या शक्यता आहेत ?
मला क्षुद्र लेखून तुम्ही महत्त्वाचे कसे ठरता ?

मी रखरखीत ठणठणीत खड्डा आहे.
मी एक जिवंत विसावा आहे.
तुम्हीही विश्रांतीला माझ्याकडेच येणार.

मी नाही टोक ओलांडल्यावर
माझ्याकडेच पोचलो ?

**१६.**

तुमच्या मनाने माझ्या मनाची कल्पना करू नका.
भ्याल, संतापाल, अव्दातव्दा बडबडत सुटाल.
हेच जर तुम्हाला सत्य उजेडात आणणे
वाटत असेल
तर माझे काहीच म्हणणे नाही.
माझे मन काही
प्रकाश किंवा उजेड पाडण्यासाठी आहे
असे मी मानत नाही.
त्यासाठी कुणालाही लावता येणारे दिवे असतात.
प्रकाश, अंधार, करुणा, सहानुभूती, त्याग,
क्रौर्य, तुरुंग, गज वाकवणे, गजांआड मरणे,
मान उंच करणे,
मान खाली घालणे -- इत्यादी इत्यादी व्यतिरिक्त
काही असू शकते काय हे महत्त्वाचे आहे.
नुसत्याच काही तपशीलांत मी रमू शकत नाही.
मग ते कितीही उदात्त असोत.

तपशीलांच्या बाजारगर्दीतून उदात्त चालणे
हेही एक किळसवाणे सरपटणेच असते.
आत्मा काय किंवा ओंकार काय
या शब्दांचे अर्थ मला माहीत नाहीत.

भाषेत इतके सरावण्याचे
मला महत्त्व वाटत नाही.
आता तुमची थोरवी मान्य करायचाच फक्त प्रश्न असेल
तर स्वतःबद्दलच्या कोणत्याही भ्रमाशिवायही
मला ती अमान्य आहे.

**१७.**

हे युध्द संपणार नाही.
कुणाचा तरी विजय होणे
म्हणजे युध्द संपणे नव्हे.

**१८.**

जिथे कुठे क्वचित् माझा शब्द पोचला
तिथे तो अभद्र ठरला. ,
माझ्या करंट्या ओसाड शब्दांवर घनघोर हल्ले झाले.

समोरच्या वस्तूचा कोणताच हिंसक उद्देश नसताना
तुम्ही जेव्हा भिता
तेव्हा तो तुम्हाला तुमच्या अस्तित्वालाच धोका वाटत असतो.
तुम्ही कोणत्या गोष्टी
इतक्या प्राणपणाने जपताहात ?

१९.

तुम्ही मैत्रीचा हात पुढे केलात
हे छान.
पण हा तुमचा नाइलाज आहे
की तुम्ही सत्य अवतरू देताहात
ते पाहा.
कारण
आपल्यात दुतर्फी शत्रुत्व जसे अशक्य आहे
तशीच मैत्रीही.

□

# वस्तू

**१.**
माझ्या मनाच्या हालचालीच्या खेरीज
अगदी जवळच
सत्य.
माझ्या मनाची हालचाल
कोणत्याही वस्तूइतकीच प्रत्यक्ष सत्य.
वस्तुमात्राच्या खेरीज
अगदी जवळच
सत्य.
माझ्या मनाची हालचाल
समजण्याची शक्यता सत्य.
मनाच्या हालचालीशी अलिप्त
वस्तुमात्र व्यापून वस्तुमात्राच्या खेरीज
अगदी जवळच
सत्य.
**२.**
दुःख : एक वस्तू.
जनावरच एक सुटू पाहणारे.
एकाच वेळी मन,
दुःख आणि त्याचा विरोध
एक वस्त्रवत् वस्तू
माझा अभेद्य पोत.
सायंकाळ व्हावी
आणि तिच्या होण्या - न होण्याशी
असावा आपला संबंध.
आता लौकरच होईल मुक्तता
अन् अंधारही दाटला
तरी दिसू नये कोणतीच शक्यता
अन् थकलेल्या रक्तबंबाळ
मनाला तरीही राहावे लागावे जागे.
...ही सर्व वस्तू.
वस्तू असते नेहमीच प्रयत्नशील
अन् नसते कधीच शांत
दुःखाचे जनावर मन
माझ्याच शरीरात
माझे आयुष्य
सायंकाळही उलटलेली वस्तू.
**३.**
आकार
करणारे उद्युक्त इच्छुक धुंद
कुठे केव्हा कसे व्हावे यांचे संपर्क
याला म्हणून मोकळे व्हावे नियती.
रंग - रूप - गंध - मार्दव

पोचतात
शरीर - मनापर्यंत,
पसरतात फांद्या
जोजावतात जवळतात
कब्ज्याच्या खात्रीत राहतात तटस्थ
किंवा होतात परक्याच
दूरस्थ.
माझ्या सावल्यांना या सावल्यांचे लागते
सोयरसुतक
अन आकारतात अर्थ ;
होते सारे आयुष्यच
अर्थविव्हल.

हे नसते दुःख,
हा नसतो शाप,
ही नसते क्रूर नियतीही ;
कारण
याखेरीजचे माझे आयुष्य
होऊच शकणार नसते
माझे आयुष्य.
संघर्षाचे उद्‌गम आकार
माझ्या बाहेरचे
होतात मीच.

वाट पाहतात प्रेयसी मनात
अन् मन उपभोगते त्यांच्या वाटा.
**४.**
नेमकी कोणती ही रात्र,
कोणत्या मानवी घटनांनी मावळलेला हा दिवस,
आमची आयुष्ये नियंत्रिणारी नेतृत्वे
कोणती वळणे देऊन गेली असतील क्षणांना,
वगैरे कित्येक गोष्टी अज्ञात
अन् तेवढ्यापुरतीच ही रात्र संदर्भहीन.
की याहूनही अज्ञात असे आहे या रात्रीला
एखादे संपूर्ण निरर्थक
अन् कधीच ज्ञात होऊ शकणार नाही असे
निखालस अस्तित्व ?

माझ्या बेसुमार दुःखाने बरबटलेली ही रात्र,
हे हळूहळू प्रगटलेले चांदणे, या अतर्क्य इमारती
अन् निद्रिस्त माणसे
की हे नुसतेच एक असंबद्ध काहूर ?
या साऱ्याच गोष्टी आहेत माझ्या शरीरात ;
साऱ्यांचेच ताण साहत आहेत माझ्या नसा
की नुसतीच माझ्या दुःखी मनाची

वेड्यावाकड्या रेषांची ही कल्पनशा ?
या रात्रीचे नेमकेपण कळल्याने संपूर्ण
होणार आहे का माझी सुटका
या रात्रीतून ?

**५.**

कधी ना कधी पाहिलेले
की
वस्तुमात्राच्या खेरीज
अगदी जवळच
सत्य.
सत्य म्हणजे सत्य या नावाने संबोधावे असे अस्तित्व.
अन् तरीही
एक वस्तू म्हणून सगळे सोहळे
कसे अगदी साद्यंत.
फक्त सत्यच काय ते
वस्तूंच्या सोहळ्यांतून मुक्त.
अन् तरीही सगळे सोहळे सत्य.

वस्तूचा खरेपणा अनिवार
वस्तूला.
मनाचे सारेच व्यवहार
मनाला.

**६.**

शरीराच्या एखाद्या भागात साठून
स्फोट पावलेली वेदना
अन् त्यात उद्ध्वस्त झालेले जगड्व्याळ साम्राज्य.
या रात्रीच्या गर्भात अडकलेले हे शरीर
कधी ना कधी उदयाला येईल.
बहुधा येईलच.
परंतु तोपर्यंतची ही गच्च रात्र,
रात्रीतला भडक कोंडलेला काळ,
हेच माझे सत्य.
माजवता येणार नाही कधीच
कोणत्याच मानवी दुःखाचा बडिवार ;
कारण दुःख ही केवळ एक वस्तू,
एखाद्या व्यक्तीची एक रचना,
कदाचित त्या व्यक्तीच्या आयुष्याचे मोल मागणारी,
पण राहणारी परकीच
दुसऱ्या व्यक्तीला.
होऊ शकणार नाही कधीच
तीच रचना दुसऱ्या कोणाचीच.

या रात्रीची ही रचना
ही माझी रचना...मीच.

७.
दुसऱ्या कोणाचेच दुःख
होऊ शकत नाही जर माझे दुःख,
तर
माझे दुःखच का व्हावे माझे दुःख ?
किंवा
माझ्याच दुःखाने का चिरडले जाऊं नये संपूर्ण चराचर ;
ही रात्र, हे चांदणे, या अतर्क्य इमारती ?
जणू शेवटचेच क्षण राहिल्याप्रमाणे
मी भयभीत
अन् तरीही अर्धवट सुरक्षित.
संपूर्ण दुःखात तसूभरही फरक न करू शकणारा मी
करतोय माझे रक्षण
अन् होतोय हवालदिल.

या माझ्या अस्तित्वाच्या सावल्या
या रात्रीवर कुठवर ठसतील ?
८.
मधेच आठवते,
फक्त सत्यालाच नाहीत वस्तूंचे जाच,
फक्त तेच निरामय,
आणि पडतो आणखी एक वळसा रात्रीला.
९.
कोणते हे दुःख कोणता प्रकार ?
काय प्रत किती तीव्रता
आणि किती माझी सहनशक्ती ?
या वैयक्तिक दुःखाच्या जागी
प्रतिष्ठापिता येईल का एखादे सामाजिक दुःख ?
अनेकांची अंतर्भूतता करू शकेल का
एखादे दुःख अधिक सुसह्य ?
दुःखाची अभिव्यक्ती ही व्हावी इतरांना
फक्त रडगाणी असा कोणता हा शाप ?
कोणत्याही एकाचे दुःख असू शकेल का
कधी संपूर्ण मानवजातीचे दुःख ?
अन् एकाच्या सुटकेत
असू शकेल का कधी असंख्यांची सुटका ?

दिसू लागला आहे आता मला चंद्र
काही क्षण
विचारच स्थगित झालेली ही वस्तू.
१०.
मी झालो आहे एक कडवट चव.
सर्व इंद्रियांची मोट केंद्रित या कडवटतेत.
हा केवळ सत्याचा अपलाप की निर्घृण खून ?
खुनानंतरच्या भयाण एकाकीपणाने

पछाडलेली घटिका.
खुनाच्या डागांचीही ही इतकीच मर्यादा ?
या घायाळ प्रश्नातली अगतिक तडफड
निरवयव आवाजहीन निःस्तब्ध.
एखाद्या खुनी माणसाच्या हिंस्त्रपणाने
आयुष्य स्वीकारीत राहिलेला मी ;
आत्महत्येला लागत नसावे कोणतेच
याहून सबळ कारण.
तेही पचवून मी अविचल दुःखी.
कोणतेही शारीरिक कृत्य या क्षणी अनपेक्षित.
अखिल मानवजात पाहते आहे माझ्याकडे
की जणू याही दुःखावर होईलच मात.
उलटलेल्या सायंकाळचे भयही दुःखात समाविष्ट झालेली वस्तू
ही रात्र.

**११.**

सत्य टाकू शकते वस्तुमात्र
एखादी वस्तूच मात्र कधीच नाही टाकू शकणार
एकही वस्तू वा वस्तुसंबंध.
रात्रीला रात्र अटळ,
दुःखाला दुःख.
रात्रीला दुःख अटळ,
अन् दुःखाला रात्र.
कधीच येऊ शकणार नाही माझा संबंध सत्याशी,
कारण त्याने टाकलेल्या
वस्तुमात्रातच मी.

तरीही मी पाहिलेले सत्य सत्यच होते
की अगदी जवळच साहजिकच असते सत्य ?
परंतु हेही असत्यच,
कारण सत्याची आठवण झाली असली माझा भाग
तरी सत्यात मी नव्हतो.

मी असताना असणारच ही रात्र,
हे आकार, या इमारती, हे दुःख.

आत्महत्या न करता जिवंत राहिलेला मी
एक दिग्विजयी दुःख
हिंस्त्र.
□

# एखाद्या सहज संध्याकाळी

एखाद्या सहज संध्याकाळी
हे सुकोमल मुलांनो
पाहा
एखाद्या निसटल्या क्षणी
दिसेल
आकाशातून संथपणे खाली पडत येणारे पान
लक्ष नका ठेवू

मजकूर वाचण्याचा प्रयत्न कराल
तर नरकात जाल
संदेश आणि सही मागाल
तर संपूर्ण आयुष्य करून घ्याल
एका मृत सत्याचे वाहक
आणि मान झुकवाल
तर भोगाल सर्वात कडक प्रायश्चित्त
आपल्या नम्रतेच्या कर्तेपणाचे

ही तुमच्या आयुष्यातली पहिली संध्याकाळ
आणि हा पहिला क्षण
सदासर्वदा फक्त पहिलीच असू शकेल
अशी ही कौमार्यभंगाची घनगंभीर पहाट
तेजस्वी पहाट
असंख्य पक्ष्यांच्या कलकलाटाहून भरगच्च पहाट
रिकामी, उदासीन आणि निव्वळ पहाट

माणसाचे आयुष्य ही एक सत्य घटना
...सर्व जीवांचे अन् वस्तूंचे आयुष्य !
सर्वयुक्त अव्याहत सत्य घटना
आणि सर्व सत्यांना कलंकभूत आपण
जर नाही पाहिले आपण हे पान
अन् झालो इतिहासजमा...निश्चयपूर्वक
...लक्ष नका ठेवू
अज्ञान परमपवित्र
एखाद्या हरणाच्या बछड्याच्या लुसलुशीत मांसाइतके
अन् तितकेच कोमल, गतिहीन अन् निष्ठुर

जपलेत
खूप जपलेत आजवर तुम्ही आपले उनाड खेळ
राहिलात अजिंक्य
... पण हे बछड्यांनो
हळूच एखादे दिवशी उगवते ही संध्याकाळ
आणि करते तुमचा पावित्र्यभंग
तुमच्या संपूर्ण अस्तित्वाला

अमोघ जखम करून
निसटून जातो एखादा क्षण

हा क्षण ढळू द्या ...
तुमचे नामोनिशाण रोवले जाईल
तुमची लांबीरुंदी वाढेल
तुमचे उपयोग वाढतील -- तापदायकताही वाढेल
तुम्ही गाल, रुसाल, चिडाल, हसाल
आणि प्रेमही कराल
प्रेम !
...ढळला जर हा क्षण
...अजिंक्य आहात
अजिंक्य राहाल...
पण मग तुमची तुम्हालाही दया येऊन काही उपयोग
होणार नाही...
पुरुषांनो परस्त्रियांना उपभोगा
स्त्रियांनो परपुरुषांच्या खाली जा
तुम्ही कोणते पावित्र्य जपताहात ?
तुम्ही काय मस्तकी धारण केले आहे ?
फितूर व्हा, विश्वासघात करा,
आणि वाटेल त्यांचे मृत्यू घडवून आणा...
स्वतः जिवंत राहा...
तुम्ही त्याग कसले करता...

हा क्षण !
हा कोणता कुठला क्षण ?
हा वेगळा आहे --
वेगळाच !
पण आता निर्णय नको
घाईने आहारी जाणे नको
उद्याचे सर्व भरंवसे निश्चित असतील
तरच हे फंद परवडतील
अन्यथा रस्ता खूपच काटायचा आहे...

सुख जपावं, दुःखावर फुंकर घालावी
एकमेकांच्या सहवासात आयुष्य मालवावं
पण मुलांनो
तुमच्या फुंकरी किती हळुवार, किती नाजुक
किंवा खरं म्हणजे किती अशक्त
उडवू शकाल का रे बाळांनो
कोट्यवधी मैल पसरलेला निगरगट्ट कचरा
तुमच्या फुंकरींनी ?
तुमची इवली इवली हृदयं
तुमचे इवले इवले उन्हाळे पावसाळे
आणि तुमचे इवलेसे समर्थ हात !

तुमचे उच्छ्वास म्हणजे फुंकरी आहेत
की घाबरलेल्या ह्रदयांची थरथर ?
तुमच्या रक्ताचे प्रवाह असे अडवेतिडवे का पळताहेत ?
तुम्हाला कसली तरी ठाम समजूत हवी आहे का ?
जी तुम्हाला सर्व अन्यायांतून मुक्त करील ?

काहीही असले तरी शांत राहा, स्वस्थ राहा
या क्षणाकडून काही मागू नका
याला काही विचारू नका
याचा स्वीकारही करू नका
याचा आणि तुमचा काही संबंध नाही

शब्दांच्या सच्च्या आणि कृतींच्या पक्क्या
वीरांनो,
ही काही लढाई नव्हे...

असतील
सर्व लढाया अनिवार्य असतील
लढायाच का सर्वच गोष्टी अनिवार्य असतील...
आपणही नाही का
अनिवार्यच ?

लुटुपुटूचे राजपुत्र, लुटुपुटूचे राक्षस
आणि लुटुपुटूच्या राजकन्या
त्यांचे वाडे ...
साधुपुरुष, वाघ, मुंगी
अन् एखादा कावळा
...शिवाय सात समुद्र,
जादूचे डोंगर आणि हलाहलांनी भरलेल्या दऱ्या...
राजपुत्रांचे विजय, राक्षसांचे पाडाव
आणि नंतरचे सुखाचे राज्य...
पण हे अनभिषिक्त सम्राटांनो
तुमच्या या चित्रमय जगाचे फलित काय ?
...थोडी अक्षरओळख अन् थोडा स्वप्नदोष...

मुलांनो,
सर्व कहाण्या विसरण्याचा हा क्षण...
अक्षरांहून महत्त्वपूर्ण, शब्दांहून अर्थपूर्ण
आणि सर्व कहाण्यांच्या अतीत...
...व्यतीत व्हावे सर्व जीवन
या क्षणात
...आणि काहीच करू नये
...असा हा क्षण !
काळाहून भेदक
आणि अनुभवाहून सत्य...

यावर कुणाचाच ठसा उमटू शकणार नाही
हे काही मानववंशाच्या इतिहासातले
पान नव्हे -- जीर्ण होऊ शकणारे...
कुठेही राहू शकणार नाही हा
साठून, साकळून
कारण याचे अंतरंग, बहिर्रंग
सर्व संपूर्ण एकच
एखाद्या संध्याकाळी
अनाहूतपणे झालेला मर्मभेद
एक अत्यंत साधा परिस्फोट

हे तुमच्या नाशाचे मूलभूत बीज
तुमच्या आकाशपाळण्याचा हा अजस्त्र संहारक
सर्व स्वप्नांचा अंतिम समाप्तक...
याला वेळीच ठेचून टाका
याची आठवणही गाडून टाका
याला पुन्हा कधीच वाव मिळता कामा नये
असे व्हा निरर्गल प्रौढ
सुंदर स्त्रियांच्या उन्मत्त स्तनांहून उद्दाम
...हे खोटे असले तरी अशक्य नाही
खऱ्या क्षणाचेही जीवन
आपल्याच लहरीवर अवलंबून !

खरंच मुलांनो,
काय कराल ? कसे पाहाल ?
नका जाऊ बळी
हे कोमल फुलांनो
संस्कृतीच्या या परंपरागत संरक्षणकल्पनेत
...हा क्षण तुमचे रक्षण करील,
तुम्हाला तेज देईल
अन् करील तुम्हाला
मालिन्य-नष्ट...
खरंच नका नष्ट करू
अनादि अनंत संहाराचे हे क्षणिक सत्य
कारण हे आहे
एक तुमच्या जन्मासाठी उतावीळ गर्भाशय
यातून जन्माला या...

किती जन्म...
किती मृत्यू...
अन् अचानक उगवलेल्या संध्याकाळचा
हा साधा, नकळत, अपरंपार क्षण...
...कधी ना कधी हा येतोच
प्रत्येकाला भेटतोच..

हा दूरस्थ
अनाकलनीय
नि:संग
अन् तरीही समक्ष...
...काळाच्या साखळीतून
नकळत निसटलेला प्रखर
शांत क्षण...

याच्याकडून काहीही मागू नका
याला काहीही विचारू नका
याचा स्वीकारही करू नका
याचा आणि तुमचा काही संबंध नाही

तुमचा कुठलाही निर्णय चुकीचा ठरण्याचा
हा पहिलाच संभव...
फक्त पाहा...
□

## रोमान्स

मी एक जशी कळी
तू एक जसा किरण
मी एक
कळी किरण्मयी

### पहिली भेट

नुक्ते नुक्ते उघडले होते तुझे डोळे
ताजे ताजे होते भोळे भोळे
अफाट आकाशात होती संथ घार
ताज्या ताज्या पाण्यात
तरंगत होते एकच बदक
वारा अजून विस्कटला नव्हता
विजा अजून तडकल्या नव्हत्या
सर्वनाशाच्या टोकावर झाले नव्हते
अजून कुणीच जिवावर उदार
सर्वात योग्य क्षण होता हाच
जेव्हा आपली भेट झाली

तुझ्या डोळ्यांत उमलला सुवास
मी झाले गंधप्रकाशी
भराभर निघून चाललेले क्षणही
राहिले संपूर्ण दुर्लक्षित
आणि एकच शांत मीलनक्षण
राहिला टिकून
सर्व क्षणांबाहेर...

### दुसरी भेट

अपेक्षांचे उधाण मनात थोपवीत
उतावीळता शक्य तितकी लपवीत
आली एक संध्याकाळ --
अतिपरिचयाहूनही अधिक
होती जवळीक अपरिचयात --
पण अपरिचय तरी कसा म्हणावा ?
माझ्यात तू होतास
तुझ्यात मी होते
सतत
परिचय आणि अपरिचय
यांचे अर्थ ओलांडून
होतो आपण जवळ...जवळ
...खूप जवळ
तुझ्यामाझ्या डोळ्यांत
लालत होती एकच ऊब
त्या उष्णतेत आधीच
विरघळले होते आपले

आपापल्या व्यक्तिमत्वांचे बर्फखंड
आता ओळखपाळख
होण्याची शक्यताच नव्हती
आणि जरूरही नव्हती...
आपली नावे आपल्याला समजली
आपले स्थान आपल्याला समजले
आपल्या आवडीनिवडी समजल्या
आपले आदर्श समजले

काही काळ चाललेल्या या
दुसऱ्या भेटीत
उलगडले आपले गुणदोषांचे पापुद्रे
शहाणपणाचे, मूर्खपणाचे अनेक प्रकार
स्वभावाच्या विशिष्ट मुरडी

आणि काहीच फरक पडला नाही
मूळ अपरिचयातली ऊब
राहिली अस्पर्शितच...

**तिसरी भेट**

तुझ्या डोळ्यांत होती
कोणताही अंधार भेदण्याची दुर्दम्य अपरंपार शक्ती
माझ्या अंधारात
झाला तुझा प्रकाशप्रवेश
उजळून निघाले माझे भान
सदेह झाले मी तुझ्या अधीन
दरवळून गेले सर्व कुरवाळ प्रदेश
अन् काळोख भेदून
अस्तित्वभर वाहिला माझ्या
तुझा शक्तिमान प्रवाह...

**चौथी भेट**

ही हवी होती खरी तिसरी पूर्वीची भेट
आणि तिसरी हवी होती चौथीचा भाग
क्रम उलटेसुलटे करणाऱ्या
आपल्या संबंधाला मिळाले नाव
या चौथ्या भेटीत
आणि प्रत्येक क्षणाचे नावीन्य
झाले एका क्षणाचे सातत्य...
असंख्य भेटींच्या या चौथ्या
भेटीचा क्षण गेला ताणत ताणत
अन् होत हळूहळू सवयीचा
पहिले वर्ष
दुसरे वर्ष
तिसरे वर्ष...

आकाशातली घार गेली लांब लांब
तळ्यातले बदक गेले खोल खोल
अनेक अंधारांशी
झाल्या तुझ्या झटापटी
अन् आपल्या झटापटी
आणि असंख्य प्रसंगांतूनही
राहिलो आपण शाबूत...
पाण्यात नावा सोडण्याचे प्रसंग
आणि छोट्या आवाजांचे खळखळून
हसण्याचे प्रसंग
यांचेच हळूहळू महत्त्व गेले वाढत
आपल्या या भेटीत...

**पाचवी भेट**

असंख्य वर्षांच्या प्रचंड
भेटीनंतर काहीशा कंटाळवाण्या
झाली आपली पाचवी भेट
जेव्हा तू शिल्लक राहिला होतास
केवळ माझ्या स्मृतीत...
या भेटीची सुरुवात
एखाद्या वादळात समूळ
उन्मळल्यासारखी झाली
आता केवळ अंधार होता
आणि आपल्या सुरुवातीच्या भेटींच्या
स्मृतींचा प्रकाश

मी अगदी थकून गेले होते...

**सहावी भेट**

तरीही शोधली मी सहावी भेट
अन् राहू लागले तीतच...
मी एक जशी कळी
तू एक जसा किरण
मी एक कळी किरणमयी
या भेटीने झाले प्रचंड संघर्ष
तुटले बंध
अन् मी राहू लागले हसतमुख

तुझ्या शक्तिमान प्रवाहात
वाहात...

आपले मन नसते कधीच सत्य
या सत्याचे भयही विसरून...
□

# माझ्या गालिबच्या कविता

१.
गालिब, काय चमत्कार आहे, माणसाचे
आयुष्य कसे जात असते निरनिराळ्या शरीरांतून.

तुला छळणाऱ्या स्त्रिया अनेक नव्हत्या गालिब
निरनिराळ्या रूपांत ती एकच स्त्री होती.

तोच अतोनात छळ कायमच चालणार काय ?
या सगळ्याचा सूड घेणाऱ्या मानवाची सुरुवात कुठे होणार ?

सूडभावनेनेही आपण कचराच होतो गालिब
आणि फूल झाल्याशिवाय तिच्या जवळपास
फिरकताच येत नाही.

२.
जिवंत स्पर्श म्हणजे मी काय शोधीत असतो ?
भावनांचा बेभान उद्रेक ? की विस्मृती ?

वसंतबहरासारखी मद्यालये प्रत्येक क्षणात भरण्यात
माझ्या मनातली हावच अडथळा होते आहे काय ?

गालिब, तुझ्या वेदना, तुझ्या जखमा, तुझे आक्रंदन
माझ्याही आयुष्याचे भागच आहेत.

काळाचेही उपकार नकोत म्हणतोस तू गालिब
पण शब्दांच्या उपकरांतून सुटका होईल तर ना !

प्रेमाच्या मार्गातले पहिलेच पाऊल मृत्यू ठरत नाही
अनेकांच्या बाबतीत, तेव्हा पुनरावृत्तीला पर्याय नसतो.

खामोशीतून कविता काढणारा तू गालिब
पहाटपक्षी तुला अस्वस्थ करतात हे केवढे आश्चर्य !

३.
ती फक्त मला परावर्तित करीत असते,
ती स्वतःहून काहीच करीत नाही.

तिच्याजवळ पोचण्याच्या प्रयत्नांना अपयश हे
एकच फळ, मी
थकून गेल्यावर फक्त परस्पर तिची जाग.

जगातला आळस काढून टाकला तर गालिब
मृत्यूची भीती राहणारच नाही.

मातीच्या पडद्याआड जाऊ शकणाऱ्या प्रेयसीच्या डोळ्यांची
आठवण ताजी ठेवण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे.

इतका करकचून मानवी ओतप्रोत तू गालिब
तुझे उष्टे मद्य मात्र संपूर्ण स्पर्शहीन !

४.
तू स्वतःच प्रिया झाला आहेस आता खंजीर तुझ्या हातात आहे.
कोणतेच वळण नसल्यासारखा तूही आता
दुर्लक्षच करतो आहेस.

कधी ना कधी प्रियेचा स्पर्श जाणला आहे आपण
गालिब, मृत्यूत आपण प्रतिस्पर्धी कसे राहणार ?

तू एक अजरामर वधस्तंभ आहेस गालिब
मृत्यूचे मद्य मागण्यास मी तुझ्याकडे आलो आहे.

चांदण्या रात्रीला आता विस्मृतीचे डाग नकोत.
स्वच्छ निर्भेळ आकाश होऊन आमची आयुष्ये
नशिबाबाहेर राहोत.

मलाही स्वतःच्या नष्ट होण्याची घमेंड आहे गालिब,
तू धुंडाळलेल्या गल्ल्यांचा आज मी सम्राट आहे.

५.
तुझे फाटके कपडे आणि मैफिलीतले विच्छिन्न चेहरे
आता मीही परिधान केले आहेत.

आपली आयुष्ये म्हणजे दुःखी माणसांचे सदरे.
प्रियेकडे जाता येण्याची केवढी ही महान सोय !

तुझी हेटाळणी करणारी माणसे आज मला हेटाळत आहेत
प्रियेच्या घराच्या मार्गावरची ही खूण तर नव्हे ?

नखरेल, चंचल, सुंदर प्रिया समोर आली गालिब.
चुकून ती मलाच गालिब समजली की काय ?

तू स्वच्छ साध्या भाषेचा अभिमान बाळगलास गालिब,
भाषाही सोडायला निघण्याची ती सुरुवात तर नव्हती ?

६.
प्रेमशोकात कपडे फाडत तू शक्तिहीन होत होतास,
तुला मारलेल्या दगडांनी आज आम्हाला जखमा होताहेत.

हातात लगाम नाही, पाय रिकिबीत नाही असा प्रियेचा
तुफान घोडा आता माझ्या रक्तातून धावतो आहे...

मला तू तुझा प्रतिस्पर्धीच समज गालिब
मीही फकीरच आहे.

माझ्या मद्याला नजर लावू नकोस,
जिवंत असताना तू खूप पिऊन गेला आहेस.

तुझ्यासारखाच मीही एक असत् आहे, पण
सत्याला आपल्याशिवाय सत् न गत् !

प्रत्यक्ष उपभोगाचे वर्णन तुलाही जमलेच नाही ;
कदाचित् शब्द हे फक्त छळाचेच माध्यम असतील.

स्वप्नातल्या पृथ्वीवर गात राहिलास प्रेमगाणी.
त्यांनी सत्यात आणलेली पृथ्वी आमच्या वाट्याला
आली आहे.

७.
. झालास धूळ, वाऱ्याने आपोआप उडवत नेले तुला प्रियेकडे ;
निसर्ग शेवटी सामील झालाच तुझ्या प्रवासात.

आपली धूळ करण्यास कोणते कष्ट पडतात
हे मात्र न सांगणारा बरा उस्ताद भेटलास.

कित्येक गोष्टी न सांगूनही गालिब
नियतीचा अटळपणा तुला माहीत होताच.

मीही सदा तहानेला किनाराच आहे गालिब ;
जग खूप पुढे गेले, पण गालिब, मागासलेलेच राहिले.

८.
प्रियेच्या लयदार सहवासात तुला प्रलय कळला.
मृत्यूला न भिण्यात तू फारच क्रौर्य दाखवलेस.

तुझ्या तळपदार ओळींनी अमानुष हत्याकांड चालवले आहे.
प्रियेला हाताच्या विळख्यात घेऊन तू हसतो आहेस.

तुझ्या मत्सराने उड्या घेऊन जळणारे हजारो पतंग
मेले आहेत, जन्माला येणार आहेत...

तुला टकरा द्यायला खूप निघाले गालिब,
संपूर्ण अडथळ्याअभावी नुसतेच भांबावून गेले...

तू आमच्यासारखाच होतास हे तुला इतके
सांगत का बसावे लागले ? हा काय डाव होता ?

९.
प्रियेच्या डोळ्यांतले काजळ ध्वनीतून निर्माण झाले --
त्याच ध्वनीतून आमचे अश्रूही निर्माण झाले काय ?

कशात काहीच नाही, पण फुकटात मिळते ते का न घ्या --
या तुझ्या प्रश्नाला असंख्य खुनांचे पातक लागले आहे गालिब.

१०.
ज्या न्यायालयातून फक्त अश्रू ढाळण्याचेच हुकूम निघतात
ते एकच न्यायालय आम्हाला उपलब्ध, असे का ?

हृदय आणि पापण्या यांच्या खटल्याची सुनावणी
आणि केशकलापांचे अंधारमय न्यायालय !

देताघेता येणारा न्याय हा अन्यायच असतो गालिब
हक्क नष्ट झाल्याशिवाय न्याय अस्तित्वातच येत नाही.

देण्याघेण्यासाठी आलाच नव्हतास तू गालिब --
पण देऊन घेऊन गेलास !

११.
कविता आणि प्रिया सारख्याच आहेत
तुमच्या देण्याइतकीच परतफेड त्या करतात.

तुमच्या सर्वस्वाला त्यांचे सर्वस्व मिळते,
मग देण्याघेण्याच्या पध्दती काहीही असोत.

कविता आणि प्रिया सत्याचे सार आहेत, खरेच गालिब,
दोघींनाही खोटेपणा अजिबात खपत नाही.

१२.
प्रत्येक कविता तुझी गालिब, आयुष्याचे चित्रच --
असंबध्द, असलगतेने भरपूर.

छळ सोसण्याचे, प्रेमात वाहण्याचे -- ही
दोन सूत्रे अप्रतिम सुंदर तुझी गालिब...

माझ्यात तुझा एक प्रतिस्पर्धी आहे
आणि स्वतः तूही गालिब...

१३.
तुझा प्रतिस्पर्धी तू नसलेला तूच होतास --

गालिबच्या रूपातून तू स्वतःलाच प्रतिस्पर्धी मानलेस.

तुझ्या पायांवरच्या फोडांच्या खुणांनी वाळवंटात प्रकाशारास,
पहाट फुलावी तशा उमलणाऱ्या तुझ्या जखमा...

प्रिया अशी नाजुक की हाती येऊनही हात लावू नये,
बोलावले तर येणार नाही म्हणून संकोचून गप्प बसावे.

विरहावस्थेत असताना तू मीलनरात्रीतले मरण मागितलेस
नेमके तसेच झाले कल्पनेहून संपूर्णच खरोखर.

इतके सांगूनही गजला अपुऱ्याच पडल्या म्हणतोस --
आम्हाला तर तुझी प्रत्येक गजल असंख्य आहे.

**१४.**

. तुझे प्रेत तुझ्या प्रियेनेच उचलले गालिब --
आता आमच्या प्रेतांचे काय होते ते पाहू ...

□□□

सूचना :-- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

पत्ता : -- चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा.,
चिंतामणीनगर, सहकारनगर नं.२,
सावरकर पथ, पर्वती,
पुणे - ४११००९

**दूरध्वनी : -- ४२२ ७८४७.**